ठाणे, मंगळवार दि. २३ जून २०२६ | वर्ष : १५, अंक : ५६, पाने : ४, किंमत : २ रुपये | Maharashtra Samrat | Maharashtra Samrat | dainikmahasamrat@gmail.com | Reg. No. THC/58/2024-2026


# दैनिक महाराष्ट्र सम्राट

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच!®

मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर, पुणे

मुख्य संपादक : चंद्रकांत भोईटे





अग्रलेख

**काळ्या पैशांचा कॉर्पोरेट खेळ**

अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) उद्योगपती विकास गर्ग यांच्या ९४० कोटी रुपयांच्या मालमत्तेवर जप्ती आणली आहे. ....पान २ वर

ई-पेपरसाठी नियमित पहा...
ePaper PDF
www.maharashtrasamrat.com

**तापमान**

| कमाल | किमान |
|---|---|
| ३५° से | २९° से |

**बाजार**

| सोने | चांदी |
|---|---|
| १,५७,३५० | २,८०,००० |

**डोकं खाजवा** –अशोक सुतार




दुष्काळ हटविण्यासाठी आलात ? लोक केव्हाच गाव सोडून गेले!..

# राज्यात २४ जूनपासून मान्सूनचा जोर वाढणार

■ मुंबईला पावसाचा ऑरेंज अलर्ट,

■ पुढील २ दिवस यलो अलर्ट

नैऋत्य मोसमी वारे अर्थात मान्सूनबाबत हवामान खात्याने महत्त्वाची माहिती जारी केली आहे. त्यानुसार पुढील 48 तासांमध्ये मान्सून (Monsoon) मुंबईत प्रवेश करणार आहे. तर मान्सूनने पुण्यात प्रवेश केल्याचेही हवामान खात्याने जाहीर केले आहे. हवामान खात्याकडून वातावरणातील बदलाचा एक नकाशा प्रसिद्ध करण्यात आला आहे. त्यानुसार मान्सून रेषा अलिबाग, पुणे, निझामाबाद, दांतेवाडा, बलंगीर, सुंदरगड, गया आणि मुझफ्फरपूरपर्यंत पोहोचली आहे, अशी घोषणा भारतीय हवामान विभागाकडून करण्यात आली आहे. त्यामुळे यंदा पावसासाठी बराच काळ ताटकळत बसलेल्या मुंबईकरांना मोठा दिलासा मिळणार आहे. मुंबईत एरवी दरवर्षी 7 ते 8 जूनच्या आसपास मान्सून दाखल होतो. मात्र, यंदा 20 जून उलटला तरी मान्सून मुंबईत दाखल न झाल्याने परिस्थिती बिकट झाली होती. दरम्यान, सोमवारी सकाळी मुंबईकरांना मान्सूनच्या आगमनाची वर्दी मिळाली. रविवारी आणि सोमवारी सकाळी मुंबई, उपनगर आणि ठाणे परिसरात मान्सूनपूर्व पावसाच्या सरी कोसळल्या. मात्र, सकाळी काही काळ रिमझिम सरी बरसल्यानंतर मान्सूनपूर्व पावसाने पुन्हा दडी मारली. त्यामुळे वातावरणातील उकाडा अजूनही कायम आहे.



### राज्यात २४ ते २८ जून या दरम्यान जोरदार पावसाची शक्यता

एल निनोचा प्रभाव, कोरडी हवा आणि कमी दाबाच्या क्षेत्रांचा अभाव या सर्व घटकांच्या एकत्र येण्यामुळे मान्सूनची वाटचाल संथ झाली होती. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, राज्यात 24 ते 28 जून या कालावधीत हवामान प्रणाली हळूहळू उत्तर किनारपट्टी आणि राज्यांच्या अंतर्गत भागांकडे सरकणार आहे. त्यामुळे पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. सोमवारपासून दक्षिण कोकण आणि महाराष्ट्राच्या काही भागात मान्सून सक्रिय होण्यासाठी अनुकूल परिस्थिती असल्याची माहिती हवामान तज्ज्ञ कृष्णानंद होसाळीकर यांनी दिली. गेल्या 15 दिवसांपासून रेंगाळलेला मान्सून सिंधुदुर्ग, रत्नागिरी, कोल्हापूर, सातारा, सांगली आणि पुण्यापर्यंत थोडाफार सक्रिय झाला आहे.

# विधान परिषदेचा संपूर्ण 17 जागांचा निकाल जाहीर

**स्थानिक स्वराज्य संस्थेच्या विधान परिषद निवडणुकीत महायुतीचा बोलबाला राहिला. तर महाविकास आघाडीची पिछेहाट पाहायला मिळाली. राज्यातील 17 पैकी 16 जागांवर महायुतीचे उमेदवार विजयी झाले आहेत. तर एका जागेवर अपक्ष आणि भाजप बंडखोराचा विजय झाला. भाजप, 11, शिवसेना 3, राष्ट्रवादी काँग्रेस 2 आणि अपक्ष 1 असा विधान परिषदेचा निकाल लागला आहे. विधान परिषदेच्या 17 जागांसाठी 18 जून रोजी निवडणूक पार पडली होती. मात्र या निवडणुकीआधीच 17 पैकी 6 ठिकाणी महायुतीचे उमेदवार बिनविरोध विजयी झाले होते. त्यामुळे आज उरलेल्या 11 जागांचा निकाल समोर आला.**

## भाजप ११ पैकी ११, शिवसेना ४ पैकी ३, राष्ट्रवादीने २ पैकी २ जागा जिंकल्या...

मुंबई - 17 जागांसाठी भाजप 11, शिवसेना 4 आणि राष्ट्रवादी 2 असा महायुतीचा फॉर्म्युला ठरला होता. त्यानूसार भाजपने 11, शिवसेनेने 4 आमि राष्ट्रवादी काँग्रेसने 2 जागांवर निवडणूक लढवली. यापैकी भाजपने (पान 2 वर)

### महाराष्ट्र विधान परिषद - १७ जागांचा निकाल

| अ. क्र. | मतदारसंघ (जिल्हा) | विजयी उमेदवार | पक्ष | निकाल |
|---|---|---|---|---|
| 1 | ठाणे | रवींद्र फाटक | शिवसेना | बिनविरोध विजयी |
| 2 | यवतमाळ | दुष्यंत चतुर्वेदी | शिवसेना | बिनविरोध विजयी |
| 3 | रायगड - रत्नागिरी - सिंधुदुर्ग | अनिकेत तटकरे | राष्ट्रवादी काँ. | बिनविरोध विजयी |
| 4 | पुणे | विक्रम काकडे | राष्ट्रवादी काँ. | बिनविरोध विजयी |
| 5 | वर्धा - गडचिरोली - चंद्रपूर | अरुण लखाणी | भाजप | बिनविरोध विजयी |
| 6 | अहिल्यानगर | प्राजक्त तनपुरे | भाजप | बिनविरोध विजयी |
| 7 | छत्रपती संभाजीनगर - जालना | सुहास शिरसाट | भाजप | विजयी |
| 8 | नाशिक | गोकुळ गिते | अपक्ष (भाजप बंडखोर) | विजयी |
| 9 | भंडारा - गोंदिया | अविनाश ब्राह्मणकर | भाजप | विजयी |
| 10 | सांगली - सातारा | धैर्यशील कदम | भाजप | विजयी |
| 11 | परभणी - हिंगोली | सईद खान | शिवसेना | विजयी |
| 12 | सोलापूर | राजेंद्र राऊत | भाजप | विजयी |
| 13 | धाराशिव - लातूर - बीड | बसवराज पाटील | भाजप | विजयी |
| 14 | नागपूर | राजीव पोतदार | भाजप | विजयी |
| 15 | जळगाव | नंदकिशोर महाजन | भाजप | विजयी |
| 16 | अमरावती | प्रवीण पोटे | भाजप | विजयी |
| 17 | नांदेड | अमर राजूरकर | भाजप | विजयी |

## नाशिकमध्ये चक्रावणारा निकाल; गोकुळ गीते विजयी

विधान परिषदेच्या 17 जागांवर झालेल्या निवडणुकीत सर्वाधिक चर्चेत ठरला तो नाशिक मतदारसंघ...नाशिकमध्ये अपक्ष उमेदवार गोकुळ गीते यांनी महायुतीचे अधिकृत उमेदवार असलेल्या शिवसेनेच्या नरेंद्र दराडेंना पराभवाची धूळ चारली.. महायुतीत नाशिकची जागा शिवसेनेच्या वाट्याला गेली होती.. तिथे नरेंद्र दराडेंना उमेदवारी मिळाली. मात्र, तिथे गिरीश महाजन समर्थक आणि भाजपचे नेते गणेश गीते यांच्यासह त्यांचे बंधू गोकुळ गीतेंनी अर्ज भरून बंडखोरी केली. त्यामध्ये गणेश गीतेंनी मुदतीच्या आधीच अर्ज मागे घेतला. मात्र, त्यांचे बंधू गोकुळ गीते यांनी मुदत संपली तरी अर्ज मागे घेतला नाही. या गोकुळ गीतेंची समजूत काढण्यासाठी गिरीश महाजन, उदय सामंत नाशिकमध्ये तळ ठोकून राहिले. चर्चेच्या डझनभरापेक्षा जास्त फेऱ्या झाल्यानंतर मतदानाच्या काही दिवस आधी गोकुळ गीतेंनी प्रचार थांबवत असल्याचं जाहीरही केलं. पण अर्ज मागे न घेतल्यानं त्यांचं नाव मतपत्रिकेत कायम होतं. त्यांनी त्यांची छुपी रणनीती सुरूच ठेवत या निवडणुकीत विजय मिळवलाय. गोकुळ गीतेंच्या विजयानंतर त्यांच्या कार्यकर्त्यांनी गुलाल उधळत एकच जल्लोष केला.

## भाजपने दहा-दहा लाख देत काँग्रेस आणि महाविकास आघाडीचे मतदार फोडले...



**अतुल लोंढेंचा गंभीर आरोप**

नागपूर विधानपरिषद निवडणुकीत भाजपचे राजीव पोतदार यांनी या निवडणुकीत 682 मतांनी विजय मिळवला. काँग्रेसचे अतुल लोंढे यांचा या निवडणुकीत पराभव झाला असून त्यांना केवळ 130 मते मिळाली आहेत. विशेष म्हणजे काँग्रेसची स्वतःची 170 मते होती आणि महाविकास आघाडीची एकूण 211 मते असतानाही अतुल लोंढे यांना फक्त 130 मते मिळाली. याचाच अर्थ काँग्रेसच्या किमान 40 नगरसेवकांनी आणि महाविकास (पान 2 वर)

### दहा दहा लाख रुपये देऊन 100 मतांची क्रॉस वोटिंग करून घेतली

अतुल लोंढे यांनी दहा दहा लाख रुपये देऊन 100 मतांची क्रॉस वोटिंग करून घेतल्याचा गंभीर आरोप नागपूर विधानपरिषद मतदारसंघातून काँग्रेसचे पराभूत उमेदवार अतुल लोंढे यांनी केला. महाविकास आघाडी आणि काँग्रेसच्या फुटलेल्या मतांसंदर्भात तक्रार करणार नाही असेही अतुल लोंढे म्हणाले. ते पुढे म्हणाले की, मुळात मी निवडणूक पराभूत झालो नाही, तर नैतिक दृष्टिकोनातून मी निवडणूक जिंकलो आहे कारण नागपूरात भाजपच्या दादागिरीसमोर मी उभं राहून निवडणूक बिनविरोध होऊ दिली नाही आणि किमान मला मिळालेले 130 काँग्रेस आणि महाविकास आघाडीचे मतदार विकले गेले नाही हेच या निवडणुकीतून सिद्ध झालंय असं अतुल लोंढे म्हणाले.



# ६ टायगर शिवसेनेत आलेत, ना तुडवायला, ना आडवायला

मुंबई : शिवसेनेच्या परिवारामध्ये सहा नवीन खासदार सामील झाले असून त्यांचा योग्य तो सन्मान केला जाईल, त्यांच्याकडे कधीही दुर्लक्ष होणार नाही याची काळजी घेतली जाईल, असा विश्वास एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला. या खासदारांच्या विश्वासाला तडा कधीही जाऊ देणार नाही, असंही ते म्हणाले. केंद्राशी निगडित प्रश्न असतील वा राज्यातील प्रश्न, कुठेही अडवणूक होणार नाही असा शब्द यावेळी एकनाथ शिंदे यांनी दिला.

ही सगळी ताकद एकत्र आल्यानंतर आपली शिवसेना अधिक भक्कम होईल असंही ते म्हणाले. ऑपरेशन टायगर आता फुलप्रूफ सक्सेस झालं आहे, असं एकनाथ शिंदे म्हणाले.

### एकनाथ शिंदेंची तूफान फटकेबाजी

यासंबंधित सर्व कायदेशीर गोष्टी आम्ही केल्या आहेत, असंही शिंदे म्हणाले. ठाकरेंची साथ सोडलेल्या सहा खासदारांनी यावेळी शिंदेंच्या शिवसेनेत जाहीर प्रवेश केला.

**एकनाथ शिंदेंचे भाषण-** उद्धव ठाकरेंची साथ सोडलेल्या सहा खासदारांनी शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश केला. हे सहा जण खऱ्या शिवसेना परिवारात सामील झाले, याबद्दल आपण त्यांचे अभिनंदन करतो असं एकनाथ शिंदे म्हणाले.चार वर्षांपूर्वी (पान 2 वर) (अधिक वृत्त पान ४ वर)

## मिंधे बाळंत झालेत, त्यांनी सहा गद्दारांना जन्म दिलाय; संजय राऊतांची टीका



शिंदेंसोबत गेलेले सहा खासदार मुंबईत परतले असून त्यांनी एकनाथ शिंदे यांची भेट घेतली आहे. त्यावर खासदार संजय राऊत यांनी जोरदार टीका केली. संजय राऊत म्हणाले की, मिंधे बाळंत झाले आहेत, त्यांनी सहा गद्दारांना जन्म दिलाय. ऑपरेशन सक्सेस झालं आहे. त्यांची बॉडी सुस्थितीत आहे असं नाही, पुढे त्यांना सिजरिंग करावं लागेल. पुढे बोलताना राऊत म्हणाले की, हा एक विक्रम आहे. केनियामध्ये एका महिलेला पाच मुलं झाली होती. इथे सहा गद्दार जन्माला आले आहेत. संजय राऊतांच्या या टीकेवर आता शिंदेंच्या शिवसेनेतून काय प्रत्युत्तर दिलं जाणार याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे.

## थोडक्यात घडामोडी

### विनातिकीट प्रवास आता महाग; किमान दंड ५०० रुपये; रेल्वे कायद्यात मोठे बदल

मुंबई - विनातिकीट रेल्वेतून प्रवास केल्यास आता अधिक भुर्दंड सोसावा लागणार आहे. विनातिकीट प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेता रेल्वेने दंड वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. दंडाची रक्कम जवळपास दुपटीने वाढवण्यात आली आहे. स्थानकांवर उद्घोषणा करून त्याबाबत माहिती देण्यात येत आहे.

**आता किती दंड आकारणार ?-** रेल्वेत तिकीटविना प्रवास करणाऱ्यांना आता दुप्पट दंडाचा फटका बसणार आहे. केंद्र सरकारने रेल्वे कायदा १९८९ मध्ये महत्त्वपूर्ण सुधारणा करून तिकीटविना प्रवासासाठीचा किमान दंड २५० रुपयांवरून ५०० रुपये केला आहे. जन विश्वास (दुरुस्ती तरतुदी) अधिनियम, २०२६ अंतर्गत करण्यात आलेल्या या बदलांमुळे रेल्वेतील विविध नियमभंगांवर अधिक कठोर आर्थिक दंडाची तरतूद करण्यात आली आहे. देशाची आर्थिक परिस्थिती बिकट असून, (पान 2 वर)

# दराडेंचा पराभव करणारे गोकुळ गिते शिंदेसेनेत जाणार?

नाशिक : नवनिर्वाचित अपक्ष आमदार गोकुळ गीते हे मुंबईकडे रवाना झाले आहे. ओझर (नाशिक) विमानतळावरून विशेष खाजगी विमानाने ते मुंबईकडे प्रयाण केले. यासाठी VSR कंपनीचे खाजगी विमान सुमारे दुपारी 3:30 वाजता नाशिकमध्ये दाखल झाले. गोकुळ गीते हे ओझर विमानतळाच्या दिशेने रवाना झाले असून, त्यांच्यासोबत शिंदे सेनेचे आमदार किशोर पाटील आणि माजी खासदार उन्मेश पाटील उपस्थित असल्याचे सांगितले जात आहे. तसेच, मंत्री उदय सामंत हे विशेष विमानासह नाशिक विमानतळावर पोहोचल्याचीही माहिती सूत्रांनी दिली आहे.





दरम्यान, आमदार झाल्यानंतर गोकुळ गीतेंच्या समर्थकांनी त्यांच्या बंगल्याबाहेर जल्लोष केला. यावेळी एकनाथ शिंदे यांच्या गाण्यांवर समर्थकांनी ठेका धरत आनंद व्यक्त केला. त्यामुळे गोकुळ गीते यांच्या राजकीय भूमिकेबाबत चर्चा रंगल्या आहेत.

### मंत्री उदय सामंत नाशिकमध्ये विमानाने दाखल; घडामोडींना वेग

सूत्रांच्या माहितीनुसार, गोकुळ गीते हे आजच मुंबईत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश करण्याची शक्यता आहे. स्वतः गीते यांनीही एका तासात आपली राजकीय भूमिका स्पष्ट करणार असल्याचे सांगितले आहे. तसेच, (पान 2 वर)

# लखनऊमध्ये कोचिंग सेंटरला आग

■ विद्यार्थ्यांनी पहिल्या मजल्यावरून उड्या मारल्या

■ भीषण दुर्घटनेत 15 मुलांचा मृत्यू, अनेकजण जखमी





**लखनऊ : उत्तर प्रदेशची राजधानी लखनऊ येथे सोमवारी दुपारी एका व्यावसायिक इमारतीत भीषण आग लागल्याने मोठी दुर्घटना घडली. या आगीत किमान 15 विद्यार्थ्यांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली असून अनेक जण जखमी झाले आहेत. तसेच काही विद्यार्थी इमारतीत अडकले असल्याची भीती व्यक्त करण्यात आली होती.**

ही कोचिंग संस्था लखनऊतील अलीगंज परिसरातील पूर्णिया भागात असलेल्या एका व्यावसायिक इमारतीच्या वरच्या मजल्यांवर चालवली जात होती. आग लागल्यानंतर इमारतीत मोठ्या प्रमाणात धूर पसरला आणि विद्यार्थ्यांमध्ये एकच गोंधळ उडाला.

### या दुर्घटनेचे कारण अस्पष्ट ...

या दुर्घटनेचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसले तरी आग लागण्यामागील कारणांचा शोध घेण्यासाठी चौकशी सुरू करण्यात आली आहे. स्थानिक प्रशासन, अग्निशमन विभाग आणि पोलीस यंत्रणा घटनास्थळी तैनात असून संपूर्ण प्रकरणाची सखोल तपासणी केली जात आहे. लखनऊतील या भीषण आगीने संपूर्ण राज्याला हादरवून सोडले असून मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार आग आणि धुरापासून बचाव करण्यासाठी सात ते आठ विद्यार्थ्यांनी थेट इमारतीवरून उड्या मारल्या. अनेक विद्यार्थी जीव वाचवण्यासाठी खिडक्यांमधून बाहेर पडण्याचा प्रयत्न करताना दिसले. घटनेनंतर परिसरात एकच गोंधळाचे वातावरण निर्माण झाले.

आगीची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या अनेक गाड्या आणि बचाव पथके घटनास्थळी दाखल झाली. अग्निशमन दलाने आग आटोक्यात आणण्याबरोबरच इमारतीत अडकलेल्या विद्यार्थ्यांना बाहेर काढण्यासाठी युद्धपातळीवर बचावकार्य सुरू केले.

उत्तर प्रदेशचे उपमुख्यमंत्री ब्रजेश पाठक यांनी घटनास्थळी भेट देऊन सुरू असलेल्या बचाव आणि (पान 2 वर)




# संपादकीय...



संपादक–चंद्रकांत भोईटे

## काळ्या पैशांचा कॉर्पोरेट खेळ

अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) उद्योगपती विकास गर्ग यांच्या ९४० कोटी रुपयांच्या मालमत्तेवर जप्ती आणली आहे. यामुळे भारतातील आर्थिक व्यवस्थेच्या विश्वासार्हतेचा प्रश्न उपस्थित होत आहे. महादेव बेटिंग ॲपसारख्या बेकायदेशीर सट्टेबाजीच्या माध्यमातून निर्माण झालेला काळा पैसा केवळ देशांतर्गत व्यवहारांपुरता मर्यादित राहत नाही, तर तो जागतिक कॉर्पोरेट व्यवहारांमध्येही शिरकाव करू शकतो, याचे हे धक्कादायक उदाहरण आहे. एका भारतीय उद्योजकाने अमेरिकेतील दिवाळखोर सॉफ्टवेअर कंपनी खरेदी केली आणि त्यामागील निधीचा स्रोत संशयाच्या भोवऱ्यात सापडला, ही बाब भारतीय भांडवली बाजारासाठी आणि नियामक व्यवस्थेसाठी चिंताजनक आहे.

भारतीय अर्थव्यवस्था वेगाने जागतिक स्तरावर विस्तारत असताना कंपन्यांच्या सीमापार व्यवहारांचे प्रमाण वाढत आहे. परदेशातील कंपन्यांचे अधिग्रहण, विलीनीकरण, विदेशी गुंतवणूक आणि जागतिक भांडवली बाजारातील सहभाग यामुळे भारतीय उद्योगजगताची ताकद वाढली आहे. मात्र या प्रक्रियेत निधीचा स्रोत, पारदर्शकता आणि नियामक नियंत्रण यांना तेवढेच महत्त्व प्राप्त झाले आहे. विकास गर्ग प्रकरणाने या सर्वच मुद्द्यांवर नव्याने चर्चा सुरू केली आहे. ईडीच्या आरोपानुसार, महादेव बेटिंग ॲपमधून निर्माण झालेला पैसा फॉरेन पोर्टफोलिओ इन्व्हेस्टर्सच्या माध्यमातून एराया लाईफस्पेसेजमध्ये आणण्यात आला आणि त्याच निधीचा वापर अमेरिकेतील एबिक्स कंपनी खरेदीसाठी करण्यात आला. हे आरोप न्यायालयात सिद्ध होणे अद्याप बाकी असले तरी, या प्रकरणातील आर्थिक व्यवहारांची रचना आणि निधीच्या हालचालींनी अनेक प्रश्न निर्माण केले आहेत. विशेषतः, बेकायदेशीर कमाईचा पैसा विविध आर्थिक माध्यमांतून वैध भांडवलात रूपांतरित करण्याच्या पद्धती किती गुंतागुंतीच्या झाल्या आहेत, हे या प्रकरणातून दिसून येते.

आजच्या जागतिक अर्थव्यवस्थेत मनी लॉन्डरिंग ही केवळ आर्थिक गुन्ह्याची बाब राहिलेली नाही. ती राष्ट्रीय सुरक्षेशी, वित्तीय स्थैर्याशी आणि गुंतवणूकदारांच्या विश्वासाशी निगडित समस्या बनली आहे. महादेव बेटिंग ॲप प्रकरणात आधीपासूनच हजारो कोटी रुपयांच्या आर्थिक गैरव्यवहारांचे आरोप आहेत. अशा परिस्थितीत या पैशाचा वापर करून अमेरिकन कंपनीचे अधिग्रहण झाले असेल, तर तो केवळ भारतापुरता मर्यादित विषय राहत नाही. तो जागतिक वित्तीय व्यवस्थेलाही स्पर्श करणारा मुद्दा ठरतो. या प्रकरणातील आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे शेअर बाजारातील लाखो किरकोळ गुंतवणूकदारांची अवस्था. एराया लाईफस्पेसेजमध्ये २३ हजारांहून अधिक लहान गुंतवणूकदार आहेत, तर विकास गर्ग यांच्या इतर दोन सूचीबद्ध कंपन्यांमध्ये तब्बल १२ लाखांहून अधिक गुंतवणूकदार आहेत. एखाद्या कंपनीच्या प्रवर्तकावर गंभीर आरोप झाल्यानंतर सर्वाधिक फटका याच सामान्य गुंतवणूकदारांना बसतो. त्यांनी आपल्या बचतीचा पैसा कंपनीच्या भविष्यातील वाढीच्या अपेक्षेने गुंतवलेला असतो. मात्र व्यवस्थापनावरील संशय, नियामक चौकशी आणि बाजारातील भीती यामुळे त्यांच्या गुंतवणुकीचे मूल्य क्षणार्धात कोसळते.

एराया लाईफस्पेसेजचा शेअर ३१६ रुपयांच्या सर्वोच्च पातळीवरून अवघ्या २४ रुपयांपर्यंत घसरल्याची वस्तुस्थिती या धोक्याची साक्ष देते. एखाद्या कंपनीच्या मूलभूत आर्थिक स्थितीपेक्षा तिच्याभोवती निर्माण झालेली प्रतिमा, अधिग्रहणाच्या घोषणा आणि भविष्यातील आश्वासने यांवर गुंतवणूकदारांचा विश्वास उभा राहत असेल, तर तो किती नाजूक असतो, हे या घटनेतून स्पष्ट होते. विशेष म्हणजे कंपनीच्या महसुलातील असामान्य चढ-उतारही प्रश्न निर्माण करतात. एका वर्षी केवळ काही लाखांचा महसूल असलेली कंपनी अचानक शेकडो कोटी रुपयांच्या व्यवहारात कशी पोहोचते आणि नंतर पुन्हा महसूल कोसळतो, याचे सखोल परीक्षण आवश्यक आहे. अर्थात, व्यवसायातील बदल, अधिग्रहण आणि विशेष व्यवहारांमुळे महसुलात चढ-उतार होऊ शकतात. परंतु अशा बदलांची कारणे आणि त्यामागील आर्थिक वास्तव गुंतवणूकदारांसमोर स्पष्टपणे मांडले जाणे आवश्यक असते.

विकास गर्ग यांच्यावरील आरोपांची मालिका देखील दुर्लक्षित करता येणार नाही. कस्टम फ्रॉडपासून सेबीच्या दंडापर्यंत आणि जुन्या सीबीआय प्रकरणांपर्यंत विविध आरोपांचा इतिहास त्यांच्या नावाशी जोडला गेला आहे. अर्थात, कोणत्याही व्यक्तीला न्यायालयीन प्रक्रियेपूर्वी दोषी ठरवता येत नाही. परंतु जेव्हा एखाद्या व्यावसायिक गटावर वारंवार अशा स्वरूपाचे प्रश्न उपस्थित होतात, तेव्हा नियामक संस्थांनी अधिक सतर्क राहणे अपेक्षित असते. या संपूर्ण प्रकरणातून नियामक संस्थांसमोरही काही कठोर प्रश्न उभे राहतात. जर ईडीचा दावा खरा असेल, तर इतक्या मोठ्या प्रमाणावर निधीची उभारणी, त्याचे मार्गीकरण आणि विदेशी कंपनीचे अधिग्रहण यापैकी कोणत्याही टप्प्यावर संशयाची घंटा का वाजली नाही? क्वालिफाइड इन्स्टिट्यूशनल प्लेसमेंट, विदेशी गुंतवणूकदार आणि सीमापार व्यवहार यांच्या तपासणीची यंत्रणा अधिक सक्षम करण्याची गरज आहे का? अशा प्रश्नांची उत्तरे शोधावी लागतील. भारतीय भांडवली बाजार गेल्या दोन दशकांत प्रचंड विस्तारला आहे. लाखो नवीन गुंतवणूकदार बाजारात आले आहेत. डिजिटल इंडिया आणि ऑनलाइन ट्रेडिंगच्या युगात शेअर बाजार सामान्य नागरिकांच्या आर्थिक नियोजनाचा भाग बनला आहे. त्यामुळे बाजारावरील विश्वास टिकवणे ही केवळ सेबी किंवा ईडीची जबाबदारी नाही; तर संपूर्ण आर्थिक व्यवस्थेची सामूहिक जबाबदारी आहे.

या प्रकरणातून एक व्यापक सामाजिक प्रश्नही समोर येतो. झटपट श्रीमंतीच्या मोहाने सट्टेबाजी, ऑनलाइन बेटिंग आणि बेकायदेशीर आर्थिक व्यवहारांचे जाळे किती मोठे झाले आहे, याचा अंदाज महादेव ॲप प्रकरणातून येतो. डिजिटल तंत्रज्ञानामुळे आर्थिक व्यवहार वेगवान झाले असले, तरी त्याच तंत्रज्ञानाचा वापर करून आर्थिक गुन्ह्यांचे स्वरूपही अधिक क्लिष्ट झाले आहे. त्यामुळे केवळ कारवाई पुरेशी नाही; तर प्रतिबंधात्मक यंत्रणा अधिक प्रभावी करणे आवश्यक आहे. विकास गर्ग प्रकरणाचा अंतिम निकाल न्यायालयीन प्रक्रियेनंतरच स्पष्ट होईल. आरोप सिद्ध होतात की नाहीत, हे काळच ठरवेल. मात्र या घटनेने एक गोष्ट अधोरेखित केली आहे की, भांडवली बाजारातील चमकदार यशोगाथांमागे आर्थिक पारदर्शकता आणि नैतिकता यांचा पाया मजबूत नसेल, तर त्या यशाचा बुरुज क्षणार्धात कोसळू शकतो. भारतीय अर्थव्यवस्थेची वाढ, जागतिक गुंतवणूक आणि कॉर्पोरेट विस्तार यांचा मार्ग पारदर्शकतेतूनच जातो. काळ्या पैशाच्या बळावर उभे राहणारे साम्राज्य कितीही भव्य दिसले, तरी त्याचा पाया कमकुवत असतो. म्हणूनच या प्रकरणाकडे केवळ एका उद्योगपतीच्या अडचणी म्हणून न पाहता, भारतीय वित्तीय व्यवस्थेला मिळालेला एक गंभीर इशारा म्हणून पाहण्याची गरज आहे. हा इशारा वेळेत समजून घेतला, तरच बाजारातील विश्वास, गुंतवणूकदारांचे हित आणि अर्थव्यवस्थेची विश्वासार्हता टिकून राहू शकेल.

# पाणीटंचाईचा मोठा फटका : मिरा-भाईंदरमधील खासगी शाळांना सुट्टी देण्याची वेळ

भाईंदर - मिरा-भाईंदरमधील तीव्र पाणीटंचाईचा फटका आता शाळा आणि उद्योगांनाही बसू लागला आहे. पाण्याअभावी भाईंदर येथील तपोवन विद्यालयाने शुक्रवारी विद्यार्थ्यांना सुट्टी दिल्याची बाब समोर आली आहे. तर शहरातील अनेक भागांमध्ये तीन ते चार दिवसांच्या अंतराने पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांचे हाल होत आहेत.

पावसाच्या विलंबामुळे मिरा-भाईंदर शहराला होणाऱ्या पाणीपुरवठ्यात सुमारे ४० टक्के कपात करण्यात आली आहे. त्यामुळे शहरात दोन दिवसाआड पाणीपुरवठा होत असून अनेक भागांत तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली आहे. दरम्यान, या पाणीटंचाईची झळ आता खासगी शाळा आणि औद्योगिक क्षेत्रालाही बसू लागली आहे.भाईंदर येथील तपोवन विद्यालयात गेल्या काही दिवसांपासून अपुरा पाणीपुरवठा होत आहे. त्यामुळे शौचालयांसह इतर मूलभूत सुविधांवर परिणाम झाला. विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांची गैरसोय टाळण्यासाठी शाळा प्रशासनाने शुक्रवारी एक दिवसाची सुट्टी जाहीर केली होती. पाण्याची व्यवस्था झाल्यानंतर शाळेचे कामकाज पुन्हा सुरळीत होणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

पाणीटंचाईचा परिणाम केवळ शाळांपुरता मर्यादित नसून औद्योगिक क्षेत्रालाही त्याचा फटका बसत आहे. अनेक उद्योगांना पुरेसे पाणी मिळत नसल्याने उत्पादनावर परिणाम होऊ लागला आहे. तसेच वाहन धुलाई केंद्रांनाही अडचणींचा सामना करावा लागत आहे.दरम्यान, उपमहापौर ध्रुवकिशोर पाटील यांनी महापालिका आयुक्तांना पत्र देऊन तरण तलाव, मोठी बांधकामे, औद्योगिक आस्थापना आणि वाहन धुलाई केंद्रांमध्ये पिण्याच्या पाण्याचा वापर बंद करण्याची मागणी केली आहे. या ठिकाणी बोअरवेल, टँकर किंवा पुनर्वापर केलेल्या पाण्याचा वापर करण्याचेही त्यांनी सुचविले आहे.शहराला होणारा पाणीपुरवठा पूर्ववत आणि सुरळीत झाल्यानंतर ही समस्या मार्गी लागेल, असे महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

दररोज वाचा ... दै. महाराष्ट्र सम्राट

## विधान परिषदेचा संपूर्ण १७ जागांचा निकाल जाहीर

**(पान 1 वरून )** 11 पैकी 11 जागा जिंकल्या. राष्ट्रवादी काँग्रेसने 2 पैकी 2 जागा जिंकल्या. तर शिवसेनेने 4 पैकी 3 जागा जिंकल्या. नाशिकची जागा महायुतीमधील शिवसेनेला सुटली होती. परंतु गोकुळ गीते यांनी बंडखोरी केली आणि त्याचाच फटका शिवसेनेला बसला. नाशिकमधील शिवसेनेचे अधिकृत उमेदवार नरेंद्र दराडे यांचा अपक्ष आणि भाजपचे बंडखोर उमेदवार गोकुळ गीते यांनी पराभव केला.

## भाजपने दहा-दहा लाख देत काँग्रेस आणि महाविकास आघाडीचे मतदार फोडले...

**(पान 1 वरून )** आघाडीच्या इतर मित्रपक्षांच्या मतदारांनी भाजपच्या उमेदवाराला साथ दिली. दुसरीकडे पराभूत उमेदवार अतुल लोंढे यांनी भाजपवर खळबळजनक आरोप केले आहेत. त्यांच्या दाव्यानुसार, भाजपने प्रत्येकी 10 लाख रुपये देऊन 100 मतदारांची 'क्रॉस वोटिंग' करून घेतली.

## ६ टायगर शिवसेनेत आलेत, ना तुडवायला, ना आडवायला

**(पान 1 वरून )** आपण शिवसेना वाचवण्यासाठी, धनुष्यबाण वाचवण्यासाठी उठाव केला. आता हा लढा दुसऱ्या टप्प्यात पोहोचला आहे, असं एकनाथ शिंदे म्हणाले.

संजय पाटील हा जनतेशी जोडलेला, ग्राऊंड लेव्हलवर काम करणारा कार्यकर्ता आहे. संजय दिना पाटील हा करा दिनांचा कैवारी असून दोस्ती जपणारा आहे. ओमराजे हे त्यांच्या मनाचे राजे आहेत. पण त्यांनी मनात निश्चय केला आणि ते आपल्यासोबत आले. आपल्या कार्यकर्त्यांशी चर्चा करून त्यांनी विकासासाठी, न्यायासाठी आपली साथ दिली. काही लोकांनी त्यांना हिणवलं, त्यांना रील स्टार म्हणाले. पण ओमराजे हे रियल स्टार आहेत.

संजय देखमुख हे उत्तम असून त्यांना अधिक उत्तम काम करायचं असल्याने ते आपल्याकडे आहे. नागेश पाटील आष्टीकर हे अत्यंत चांगले आहेत. भाऊसाहेब वाकचौरे हे देखील असेच कार्यकर्ते आहे. हे सर्व खासदार मतदारसंघातील विकासासाठी आपल्याकडे आले आहेत. 2022 साली बाळासाहेबांची विचारधारा सोडून दुसरा विचार आला त्यावेळी आम्ही उठाव केला. त्यावेळी आपल्यासोबत आलेले 40 आमदार परत निवडून येणार नाहीत असं म्हटलं जायचं. परंतु 40 चे 60 आमदार निवडून आले. चांदा ते बांदापर्यंत शिवसेना मोठी झाली. आमची नीती स्पष्ट होती, विचारधारेला घेऊन आम्ही पुढे गेलो. आता आपल्या या कामात सहा खासदार सामील झाले आहेत. या सहा लोकांची ताकद, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांमुळे शिवसेना आणखी बळकट होतील. या खासदारांच्या मतदारसंघातील विकासकामं, त्याच्या अडचणी सोडवण्यात येतील. मी दिलेला शब्द पाळतो, त्यामुळे एकनाथ शिंदेंवर विश्वास ठेवतात.

## विनातिकीट प्रवास आता महाग; किमान दंड ५०० रुपये; रेल्वे कायद्यात मोठे बदल

**(पान 1 वरून )** त्यातून मार्ग काढण्यासाठी नानाविध उपाययोजना केल्या जात आहेत. त्यात आता रेल्वेतून विनातिकीट प्रवास करणाऱ्यांना हेरून, त्यांना कडक शासन करण्यासाठी पावले उचलली आहेत. राष्ट्रपतींची मंजुरी मिळाल्यानंतर रेल्वे मंडळाने सर्व विभागीय प्रशासनांना सुधारित नियमांची माहिती दिली असून अनेक ठिकाणी नव्या दंडात्मक तरतुदींची अंमलबजावणी सुरू झाली आहे. रेल्वे अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, तिकीटाविना प्रवास करणाऱ्या प्रवाशांकडून ५०० रुपयांचा किमान दंड आकारला जात आहे.

सुधारित कलम १३७ नुसार, वैध तिकीट नसताना प्रवास करणे किंवा वापरलेले तिकीट पुन्हा वापरणे या प्रकारांसाठी प्रवाशांना प्रवासभाड्यासह अतिरिक्त शुल्क भरावे लागेल. या शुल्काची किमान रक्कम ५०० रुपये निश्चित करण्यात आली आहे. दंड भरण्यास नकार दिल्यास संबंधित प्रकरण न्यायालयात पाठवले जाऊ शकते.

याशिवाय दुसऱ्या व्यक्तीच्या नावावरील तिकीट वापरून प्रवास करणाऱ्यांकडूनही किमान ५०० रुपयांचा दंड आकारला जाईल. अशी तिकिटे जप्त करून संबंधित प्रवाशाकडून भाडे आणि अतिरिक्त शुल्क वसूल करण्यात येणार आहे.

**अनधिकृत विक्रेत्यांना चाप -** रेल्वे स्थानके किंवा गाड्यांमध्ये अनधिकृत फेरीविक्री (हॉकिंग) अथवा भीक मागताना आढळल्यास २,००० रुपयांचा दंड आकारला जाईल. वारंवार नियमभंग करणाऱ्यांना एका वर्षापर्यंत कारावासाची शिक्षा होऊ शकते.

**महिलांच्या डब्यात प्रवेश केल्यास २,५०० रुपयांचा दंड -** महिलांसाठी राखीव डबे, आसने किंवा शयनिका बेकायदेशीररीत्या वापरणाऱ्या पुरुष प्रवाशांवर २,५०० रुपयांचा दंड आकारण्याची तरतूद करण्यात आली आहे. अशा प्रवाशांना रेल्वे कर्मचारी तत्काळ हटवू शकतील.

**धोकादायक वस्तूंवर १० हजारांचा दंड -** रेल्वेमध्ये प्रतिबंधित किंवा धोकादायक वस्तू घेऊन प्रवास करणाऱ्यांवर किमान १०,००० रुपयांचा दंड आकारला जाईल. तसेच प्रवासी क्षेत्रात अनधिकृत प्रवेश किंवा अतिक्रमण करणाऱ्यांना ५०० रुपयांचा दंड भरावा लागेल.

**दर तीन वर्षांनी दंडात वाढ -** जन विश्वास कायद्यानुसार विविध दंडांच्या रकमांमध्ये दर तीन वर्षांनी १० टक्क्यांनी वाढ करण्याची तरतूद करण्यात आली आहे. किरकोळ गुन्ह्यांचे गुन्हेगारीकरण कमी करून दंडाधारित अंमलबजावणीला प्राधान्य देणे, नियमपालन वाढवणे आणि विश्वासाधारित प्रशासनाला चालना देणे हा या सुधारणांचा मुख्य उद्देश असल्याचे केंद्र सरकारने स्पष्ट केले आहे. नव्या नियमांमुळे रेल्वेतील शिस्त अधिक कडक होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात असून तिकीटविना प्रवास करणाऱ्यांना आता मोठा आर्थिक फटका बसणार आहे.

## लखनऊमध्ये कोचिंग सेंटरला आग

**(पान 1 वरून )** मदतकार्याचा आढावा घेतला. त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करून जखमींना तातडीने उपचार उपलब्ध करून देण्याच्या सूचना दिल्या.

दरम्यान या भीषण दुर्घटनेनंतर मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी अलीगढ आणि हाथरस येथील नियोजित कार्यक्रम रद्द केले आणि तातडीने लखनऊकडे रवाना झाले. त्यांनी घटनास्थळी पोहोचून परिस्थितीचा आढावा घेतला तसेच बचावकार्य वेगाने पूर्ण करण्याचे निर्देश दिले.

केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह हे देखील या दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर लखनऊला भेट देणार असल्याची माहिती समोर आली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही या घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त केले आहे. त्यांनी मृतांच्या कुटुंबीयांप्रती शोकसंवेदना व्यक्त करत मदत जाहीर केली आहे. तसेच जखमींच्या लवकरात लवकर प्रकृतीत सुधारणा व्हावी, अशी प्रार्थना केली आहे.

## दराडेंचा पराभव करणारे गोकुळ गिते शिंदेसेनेत जाणार?

**(पान 1 वरून )** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी फोन करून अभिनंदन केल्याचे आणि 'नंदनवन' येथे भेटण्यासाठी बोलावल्याचे गोकुळ गीते यांनी सांगितले आहे. त्यामुळे त्यांच्या मुंबई दौऱ्याकडे आणि पुढील राजकीय निर्णयाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.


### नवी मुंबई महानगरपालिका

**शहर अभियंता (विदयुत विभाग)**

**निविदा सुचना क्र. कार्यकारी अभियंता, (विदयुत-1)/07/2026-2027**

**कामाचे नाव :-** वाशी से. 1अ कर्मवीर भाऊराव पाटील उद्यान व वाशी से. 7 आई बाबा उद्यान येथील जुन CFL फिटींग बदलुन नविन शोभिवंत LED फिटींग लावणे .

**अंदाजपत्रकीय रक्कम रु :-** 13,19,057/-

निविदा पुस्तीका ई-निविदा (E-tendaring) संगणक प्रणालीच्या https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर दिनांक 23/06/2026 रोजी प्राप्त होतील. निविदेचे सादरीकरण https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर Online करण्याचे आहे. ई-निविदा (E-tendering) प्रक्रियेतील कोणत्याही तांत्रिक अडचणींसाठी सदर संकेतस्थळावर दिलेल्या हेल्प डेस्क नंबर वर संपर्क करावे.

कोणतीही निविदा स्विकारणे अथवा नाकारण्याचा अधिकार मा. आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांनी राखुन ठेवला आहे.

सही/-
प्रविण गाडे
कार्यकारी अभियंता (विद्युत विभाग)
नवी मुंबई महानगरपालिका

जाक्र-नमुंमपा/जसं/जाहिरात/469/2026



### ठाणे महानगरपालिका, ठाणे

सार्वजनिक बांधकाम विभाग
निविदा सुचना

ठाणे महानगरपालिकेच्या, प्र.क्र.१२ (ड) मध्ये ठामपा मुख्यालया लगत असलेले गटाराचे रुंदीकरण, पदपथावरती ग्रॅनाईट व डेकोरेटिव्ह ग्रिल बसवून नुतनीकरण करणे एका कामांची ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत. ज्या कंत्राटदारांविरुध्द शासकिय /निमशासकिय /सार्वजनिक क्षेत्रातील संस्था व उपक्रम /स्थानिक स्वराज्य संस्था इ. यांनी शिस्त भंगाचे कार्यवाहीच्या अनुषंगाने नोंदणी पत्र रद्द करण्याची कार्यवाही केली /सुरु आहे. अशा कंत्राटदारांना निविदा प्रक्रियेत भाग घेता येणार नाही. निविदा सुचना व निविदाप्रपत्र ठाणे महानगरपालिकेचे https://mahatenders.gov.in संकेत स्थळावर एका कामासाठी दि. २३.०६.२०२६ ते दि. ०७.०७.२०२६ पर्यंत उपलब्ध आहेत. ऑनलाईन निविदा महानगरपालिकेचे संकेत स्थळावर दि. ०७.०७.२०२६ रोजी सायं. १६.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. प्राप्त निविदा दिनांक ०९.०७.२०२६ रोजी १६.०० वाजता निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधी यांचे समक्ष उघडण्यात येतील. कोणतीही एक अथवा सर्व निविदा प्रपत्रके कारणे न दाखविता नाकारण्याचा अधिकार नगर अभियंता यांनी राखून ठेवला आहे.

ठामपा/पिआरओ/पिडब्ल्यूडी-मु/२३३/२०२६-२७ सही/-
दि:२२.०६.२०२६ नगर अभियंता
**Pls visit our oficial web-site** ठाणे महानगरपालिका, ठाणे
**www.thanecity.gov.in**

**अनधिकृत बांधकामाला आळा घाला..**
**अनधिकृत बांधकाम दिसल्यास प्रभाग समितीत तक्रार करा !**


### जाहीर नोटीस

प्रति.
विजय आत्माराम चव्हाण अर्जदार/यादी
सी–४०३, डी. पी. स्टार, त्रिवेणी,
दत्तमंदिर रोड, राधाकृष्ण मंदिर जवळ
नाहूर (पश्चिम), मुंबई ४०००७८

विरूध्द

उप निबंधक, जन्म, मृत्यू व विवाह सामनेवाला/प्रतिवादी
एफ साऊथ विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका
परेल, मुंबई ४०००१२

ज्या अर्थी, जन्म, मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ व भारताचे राजपत्र जन्म/मृत्यू नोंदणी ( सुधारणा ) कायदा २०२३, मधील कलम ११ (३) अन्वये जन्माची मृत्यूची नोंद घेऊन जन्मनोंद / मृत्यूनोंद प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी संबंधित प्राधिकरणास आदेश होणे बाबत **विजय आत्माराम चव्हाण** यांनी या न्यायालयात अर्ज केला आहे. या अनुषंगाने महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे कडील शासन निर्णय क्र. जमृनों २०२५/ (ई.ऑ.९९११८१) प्र.क्र.२२/कु.क./दि. १२/०३/२०२५ अन्वये जाहीर नोटीस प्रसिध्द करण्यात येत आहे.

त्याअर्थी, सर्व नागरिकांस कळविण्यात येते की, अर्जदार / वादी यांनी **कै. ललिता आत्माराम चव्हाण** यांचा मृत्यू दिनांक **१२/०७/२०२४** रोजी (पत्ता) **रूम न ७०/२ रा मजला फ्लॅट नं. ५०१, आशिर्वाद बिल्डींग एन. एम. जोशी मार्ग, बकरी अड्डा, मुंबई – ४०००११** या ठिकाणी झालेला आहे. असा दावा केलेला आहे. परंतु सदरचा जन्मनोंद / मृत्यूनोंद संबंधित वॉड मधील जन्म / मृत्यू निंबधक, तथा वैद्यकिय आरोग्य अधिकारी यांच्या कार्यालयात करण्यात आलेली नाही. सदरची नोंद बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संबंधित विभागाच्या जन्म नोंदणी अभिलेखात घेऊन जन्म / मृत्यू निबंधक, तथा वैद्यकिय आरोग्य अधिकारी यांनी जन्माचे प्रमाणपत्र निर्गमित करणे बाबत कोणाचेही हितसंबंध असल्यास /आक्षेप असल्यास किंवा काही माहिती पुरवावयाची असल्यास त्यांनी या जाहीर नोटीसच्या तारखेपासून १५ दिवसाच्या आत या तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय जिल्हाधिकारी कार्यालय मुंबई शहर, सामान्य प्रशासन शाखा, डी. डी. बिल्डिंग जुने जकातघर, दुसरा मजला, शहीद भगदसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई–४००००१ येथे हजर राहून आपले लेखी स्वरुपात आक्षेप/म्हणणे सादर करावे.

आणखी असेही कळविण्यात येते की, जर उपरोक्त मुदतीच्या आत कोणी आक्षेप / म्हणणे सादर न केल्यास, सदरहू न्यायालयाद्वारे उचित कार्यवाही करुन उपरोक्त अर्जदार यांच्या दाव्यानुसार नोंदणी करणे बाबत संबंधित जन्म /मृत्यू निबंधक यांना आदेश निर्गमित करण्यात येईल अथवा न्यायोचित निर्णय देण्यात येईल. याची कृपया नोंद घ्यावी.

पता. रूम नं ७०, २ रा मजला, फॉट नं. ५०१, आशिर्वाद बिल्डिंग, एन.एम जोशी मार्ग, बकरी अड्डा, मुंबई ४०००११
मो. ९८१९३३२९०६

### जाहिर नोटीस

दिनांक २२/०६/२०२६

ह्याद्वारे सर्व संबंधितांस कळविण्यात येते की, मौजे कल्याण येथील डुंबरे चाळ, रुम नं. ४, कोळसेवाडी, विनायक चौक, जरीमरी नगर, गणेश मंदिरास लागून असलेली निवासी रुम मिळकत जिचे क्षेत्रफळ सुमारे २८० चौ. फुट ते ३०० चौ. फुट चे आसपास सेल्फ कंटेन्ट असलेली रुम व तीस असलेला विद्युत ग्राहक क्र. ०२०८५००९६०६७, पिसी–५, मिटर क्र. ९०१०२५२५६४, मालमत्ता क्र. डी ०४००६०७९६०डी अशी मिळकत तीस असलेला सर्व्हे नं. ९०/ए आळी नं. बी– २०८४ व महानगरपालिकेचा घर क्र. १७१८ व मिळकत विकत घेतलेचा रजि. दस्त क्र. १२२२/१९९८ आमचे पक्षकार श्री. वाळू काशिनाथ शिंदे यांचे मालकी हक्काची अशी होती आणि आहे. परंतु श्रीमती मिरा वाळू शिंदे या आमच्या पक्षकाराच्या नात्याने पत्नी असल्याने आमचे पक्षकाराने महानगरपालिकेच्या कर खात्याच्या दप्तरी व विज मंडळाच्या लाईट बिलास आपले स्वतःचे नाव न लावता त्यांनी सदर व्यक्ती पत्नी म्हणुन त्यांचे नाव लावले. परंतु त्यांना सदरहु रुम विकण्यास कोणताही अधिकार दिलेला नव्हता. सदर व्यक्ती आमच्या अशिलांचा गैरफायदा घेऊन इतर कोणा इसमास सदर रुम विकू पाहत आहेत.

सदरची बाब गैरवाजवी अशी आहे कारण आमचे पक्षकाराने सदर रूम घेण्याकरीता पैसे लावलेले होते. फक्त पत्नी म्हणुन त्यांचे नावे केलेली होती व आजरोजी सदर त्यांच्या पत्नी त्यांचे सोबत राहत नसताना ते रुम विकु पाहत आहेत हे अत्यंत गैरवाजवी आहे. म्हणुन ह्या जाहिर नोटीसद्वारे सर्व संबंधितांस कळविण्यात येते की, सदरच्या मिळकतीच्या बाबतीत त्यांनी श्रीमती मिरा वाळू शिंदे यांचेशी कोणतेही व्यवहार करुन नये. सदर व्यक्तीचे बरोबर कोणीही कोणत्याही प्रकारचा व्यवहार केल्यास त्या–त्या गोष्टीची सर्वस्वी जबाबदारी त्यांच्या स्वतःची असेल व त्यास आमचे अशिल कोणत्याही प्रकार जबाबदार नसतील याची त्या त्या व्यक्तीने नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस सदर वर्तमान पत्राद्वारे प्रसिद्धीस दिली असता सदर वर्तमान पत्राद्वारे प्रसिद्ध केली असे.

कळावे,

जाहीर नोटीस प्रसिध्दीस देणार/
पक्षकार यांची सही
वाळू का. शिंदे

पक्षकार यांचे तर्फे
त्यांचे सल्लागार
ॲड. एम.बी. गाडे व ॲड सोनाली ग. पारधी

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, ठाणे विभाग,
ठाणे, वेस्ट व्हयू, तिसरा मजला,राम मारुती रोड, ठाणे (प.) ४००६०१.

### Public Notice

Service Request Number : THN/00008/18/26
Inquiry/case No. : ACC/I/01/2026
Name of the Trust : SHREE NAGESHWAR MAHADEV CHARITABLE TRUST
**Address of the Trust :** HOUSE NO. 2446, GANPATI COLONY, AIROLI, NAVI MUMBAI, THANE, THANE, THANE
**Name of the Applicant :** NAKKA NARSAYYA BUCHAIAH

To
**All Concerned having interest**
Whereas in the above application under section 19 of the Maharashtra Public Trust Act 1950, an enquiry is to be made under section 19 of the said Act, on the following points by the Asst. Charity Commissioner, Thane.

1. Whether a Trust in the respect of the above exists and whether such Trust is a public Trust?
2. Whether any of the following properties are the properties of such Trust?

**Movable Property**

| SR | Property Details | Estimated Value |
|---|---|---|
| 1 | Cash In Hand | 1000.00 |

**Value of Movable Property :** Rs. 1000/- Only
(In Words Rs. One Thousand Only)

**Immovable Property**

| SR NO | Town Or Village | CS Or Municipal Or Survey No | Area | Assessment Or Judiciary | Tenure Or Nature | Estimated Value |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Nil | Nil | Nil | Nil | Nil | 0.00 |

Value of Immovable Property : Rs. 0/- Only
(In Words Rs. Only)

This is to call upon you to submit your objections or any evidences if any, at the above office address within 30 days from the date of publication of this notice in written. If not received anything within given period, the inquiry would be completed & necessary orders will be passed. If no objections are received within the stipulated time then further inquiry would be completed and necessary orders will be passed.

This notice given under my hand and seal of the Office on this date 22/06/2026.

Stamp

Sign/-
Superintendent
Public Trusts registration Office,
Thane




## सेंट्रल बँक ऑफ इंडिया

■ पदाचे नाव & तपशील:
1 अप्रेंटिस (Apprentice) 4500
■ शैक्षणिक पात्रता: कोणत्याही शाखेतील पदवी
■ वयाची अट: 31 मे 2026 रोजी 20 ते 28 वर्षे [SC/ST: 05 वर्षे सूट, OBC: 03 वर्षे सूट]
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/OBC/EWS: ₹944/- [SC/ST/महिला: ₹708/-, PWD: ₹236/-]
■ अर्ज करण्याची पद्धत: Online
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: 22 जून 2026
■ परीक्षा: जुलैचा पहिला आठवडा
■ अधिकृत वेबसाइट
https://centralbank.bank.in/en

## सर जे.जे.समूह रुग्णालय

■ पदाचे नाव & तपशील:
1 डाटा एन्ट्री ऑपरेटर (DEO) 10
2 शिपाई 02
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.1: (i) 12वी उत्तीर्ण (ii) MS-CIT (iii) मराठी टंकलेखन 30 श.प्र.मि. व इंग्रजी 40 श.प्र.मि.
पद क्र.2: 07वी ते 10वी उत्तीर्ण
■ वयाची अट: 31 मे 2026 रोजी 18 ते 38 वर्षे
■ नोकरी ठिकाण: मुंबई
■ Fee: फी नाही
■ अर्ज करण्याची पद्धत: Offline/ Interview
■ मुलाखतीचे ठिकाण: महात्मा जोतिबा फुले जन आरोग्य योजना कार्यालय, मुख्य इमारत, तळमजला, ग्रँट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय & सर जे.जे.समूह रुग्णालये मुंबई- 400008
■ थेट मुलाखत: 24 जून 2026 (11:00 AM ते 05:00 PM)
■ अधिकृत वेबसाइट
https://ggmcjjh.com/

## भारतीय नौदलात अग्निवीर

■ पदाचे नाव & तपशील:
1 अग्निवीर (अप्रेंटिस) 01/2027 बॅच —
2 अग्निवीर (अप्रेंटिस) 02/2027 बॅच —
■ शैक्षणिक पात्रता: (i) 50% गुणांसह 10वी उत्तीर्ण (ii) मरीन इंजिनिअरिंग & सिस्टिम्स, मेकॅनिकल, प्रॉडक्शन / ऑटोमोबाईल, रेफ्रिजरेशन & एअर कंडिशनिंग, रिपेअर & मेंटेनन्स, पॉवर प्लांट इंजिनिअरिंग, इंडस्ट्रियल / प्रॉडक्शन, मेंटेनन्स, मशीन, मॅन्युफॅक्चरिंग / मॅन्युफॅक्चरिंग टेक्नॉलॉजी, मेकॅट्रॉनिक्स, मेटलर्जी, इन्स्ट्रुमेंटेशन, इलेक्ट्रॉनिक्स इन्स्ट्रुमेंटेशन & कंट्रोल इंजिनिअरिंग, इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रॉनिक्स & कम्युनिकेशन, इन्स्ट्रुमेंटेशन टेक्नॉलॉजी, इलेक्ट्रॉनिक्स, इलेक्ट्रिकल & इलेक्ट्रॉनिक्स, इलेक्ट्रॉनिक्स इन्स्ट्रुमेंटेशन & कंट्रोल इंजिनिअरिंग डिप्लोमा
■ वयाची अट:
01/2027 बॅच: जन्म 01 डिसेंबर 2004 ते 31 मे 2009 दरम्यान
02/2027 बॅच: जन्म 01 मे 2005 दरम्यान ते 31 ऑक्टोबर 2009 दरम्यान
■ Fee: ₹550+18% GST (Calculate GST)
■ अर्ज करण्याची पद्धत: Online
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: 29 जून 2026
परीक्षा (Stage I-INET): ऑगस्ट 2026
परीक्षा (Stage II- 01/2027): ऑक्टोबर 2026
■ परीक्षा (Stage II- 02/2027): मार्च 2027
■ अधिकृत वेबसाइट
https://indiannavy.gov.in/

# अपग्रॅड स्कूल ऑफ टेक्नॉलॉजी आणि एडीवायपीयू यांच्याकडून इंडस्ट्री-इंटिग्रेटेड बी.टेक प्रोग्राम लाँच

ठाणे/नवी मुंबई : अपग्रॅड स्कूल ऑफ टेक्नॉलॉजी (यूजीएसओटी) आणि अजिंक्य डीवाय पाटील युनिव्हर्सिटी (एडीवायपीयू) यांनी आज चार वर्षांचा निवासी बी.टेक इन कॉम्प्युटर सायन्स इंजिनिअरिंग (आर्टिफिशिअल इंटेलिजन्स) प्रोग्राम लाँच करण्यासाठी धोरणात्मक सहयोगाची घोषणा केली. विद्यार्थ्यांना सुरुवातीपासून उद्योग-संबंधित एआय इंजिनिअरिंग कौशल्यांसह यूजीसी मान्यताप्राप्त पदवी प्रदान करण्यासाठी हा प्रोग्राम डिझाइन करण्यात आला आहे. पारंपारिक इंजिनिअरिंग शिक्षण आणि एआय-चालित कार्यक्षेत्रातील झपाट्याने बदलणाऱ्या गरजा यांमधील वाढती तफावत दूर करणे या प्रोग्रामचा मुख्य उद्देश आहे. या प्रोग्रामची पहिली बॅच ऑगस्ट-सप्टेंबर २०२६ मध्ये सुरू होणार आहे. कोणत्याही मान्यताप्राप्त मंडळाकडून (सीबीएसई, आयसीएसई किंवा राज्य मंडळे) भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि गणित (पीसीएम) विषयांमध्ये किमान ५० टक्के गुणांसह इयत्ता १२ वी उत्तीर्ण झालेले विद्यार्थी या प्रवेशासाठी पात्र आहेत.



या सहयोगांतर्गत, अजिंक्य डीवाय पाटील युनिव्हर्सिटी कॅम्पस पायाभूत सुविधा, निवासी शिक्षण वातावरण प्रदान करेल आणि यूजीसी-मान्यताप्राप्त बी.टेक पदवी बहाल करेल. यूजीएसओटी एडीवायपीयूसोबत सहयोगाने इंडस्ट्री-इंटिग्रेटेड (उद्योगाभिमुख) शिक्षण अनुभव देण्यास मदत करेल. यामध्ये जगातील आघाडीच्या तंत्रज्ञान कंपन्यांमध्ये कार्यरत असलेल्या अभियंत्यांकडून लाईव्ह मार्गदर्शन, दर सहा महिन्यांनी अद्ययावत होणारा एआय-फर्स्ट अभ्यासक्रम, पहिल्या सेमिस्टरपासून प्रत्यक्ष कोडिंग व प्रॉडक्ट-बिल्डिंग स्प्रिंट्स, आणि उद्योग क्षेत्रातील संस्थापक, सीएक्सओ व आघाडीच्या प्रमुखांसोबत नियमित संवाद यांसारख्या वैशिष्ट्यांचा समावेश असेल.

या सहयोगाबाबत मत व्यक्त करत अजिंक्य डीवाय पाटील ग्रुपचे चेअरमन आणि अजिंक्य डी.वाय. पाटील युनिव्हर्सिटीचे चान्सलर डॉ. अजिंक्य डीवाय पाटील म्हणाले, " अजिंक्य डीवाय पाटील ग्रुपमध्ये आमचा नेहमी विश्वास राहिला आहे की, शिक्षण हे भविष्यानुसार बदलले पाहिजे. हा सहयोग शैक्षणिक विश्वासार्हता आणि उद्योग क्षेत्रातील उपयुक्तता यांना एकाच व्यासपीठावर आणतो, ज्यामुळे विद्यार्थी मान्यताप्राप्त पदवी मिळवण्यासह वेगाने बदलणाऱ्या जगात प्रगती करण्यासाठी आवश्यक असलेली कौशल्येही आत्मसात करतील." अपग्रॅड स्कूल ऑफ टेक्नॉलॉजीचे सीईओ विश्वा मोहन म्हणाले, "भारतात इंजिनिअरिंगच्या गुणवत्तेची कधीच कमतरता नव्हती, कमतरता होती ती उद्योग क्षेत्राला प्रत्यक्षात काय पाहिजे याच्याशी सुसंगत असणाऱ्या इंजिनिअरिंग शिक्षणाची. ही तफावत दूर करण्यासाठी अजिंक्य डीवाय पाटील युनिव्हर्सिटीसोबत हा सहयोग करण्यात आला आहे: एक खरी पदवी, एक खरा कॅम्पस आणि खरी कौशल्ये ज्यांच्या जोरावर कंपन्या पहिल्या दिवसापासून नोकरी देतात. आम्ही ज्या युनिव्हर्सिटींसोबत काम करत आहोत, तिथे हेच मॉडेल आणत आहोत.

विद्यार्थी तीन भविष्य-केंद्रित विशेष शाखांमधून निवड करू शकतात:

·फुल स्टॅक एआय आणि क्लाउड इनोव्हेशन– यामध्ये एंड-टू-एंड सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट, एआय ॲप्लिकेशन्स आणि क्लाउड-नेटिव्ह तंत्रज्ञानाचा समावेश आहे. · एआय आणि क्वांटम कम्प्युटिंग– यामध्ये आर्टिफिशिअल इंटेलिजन्स आणि उदयास येणाऱ्या क्वांटम कम्प्युटिंगच्या संकल्पना व उपयोजनांचे संयोजन आहे.

· एआय आणि जेनएआय इंजिनिअरिंग– हे प्रामुख्याने जनरेटिव्ह एआय, लार्ज लँग्वेज मॉडेल्स आणि नेक्स्ट-जनरेशन एआय प्रॉडक्ट डेव्हलपमेंटवर केंद्रित आहे.

टेक्निकल प्रशिक्षणाव्यतिरिक्त या प्रोग्राममध्ये सात सेमिस्टरचा स्टार्टअप ट्रॅक समाविष्ट करण्यात आला आहे, जो विद्यार्थ्यांना इंजिनिअरिंगच्या कौशल्यांसोबत उद्योजकता, नेतृत्व आणि व्यावसायिक कौशल्ये विकसित करण्यास सक्षम करतो. या प्रोग्राममधील उत्तीर्ण विद्यार्थ्यांना अपग्रॅडच्या करिअर सपोर्ट परिसंस्थेचा फायदा मिळेल, ज्यामध्ये ३००० पेक्षा जास्त हायरिंग पार्टनर्स आहेत. तसेच या प्लेसमेंट नेटवर्कने आर्थिक वर्ष २०२३ ते आर्थिक वर्ष २०२५ दरम्यान १,१०,००० हून अधिक प्लेसमेंट्स मिळवून दिल्या आहेत, ज्यामुळे विद्यार्थ्यांचा रोजगार आणि करिअरच्या वाढीचा मार्ग अधिक प्रबळ झाला आहे. भारतात दरवर्षी जवळपास १.५ दशलक्ष इंजिनिअरिंग पदवीधर तयार होतात, तरीही रोजगाराची मोठी तफावत या क्षेत्रासमोर आव्हान म्हणून उभी आहे. इंजिनिअरिंग हा अजूनही देशातील सर्वात लोकप्रिय करिअर मार्गांपैकी एक असला तरी अनेक पदवीधरांकडे एआय, क्लाउड कम्प्युटिंग आणि प्रगत सॉफ्टवेअर इंजिनिअरिंग यांसारख्या उदयोन्मुख क्षेत्रांसाठी आवश्यक असणाऱ्या कौशल्यांचा अभाव दिसून येतो. भविष्यासाठी सज्ज असलेल्या मनुष्यबळाची मागणी झपाट्याने वाढत असताना अपग्रॅड स्कूल ऑफ टेक्नॉलॉजी आणि अजिंक्य डीवाय पाटील युनिव्हर्सिटी यांच्यामधील या सहयोगाचा अशा इंडस्ट्री-इंटिग्रेटेड आणि एआय-फर्स्ट इंजिनिअरिंग शिक्षण मॉडेलच्या माध्यमातून ही तफावत दूर करण्याचा मनसुबा आहे.

# कामाच्या ठिकाणी प्रेम टिकू शकते का? मराठी ZEE5ची नवी सीरिज

## 'प्रेमाला कंडिशन्स अप्लाय' घेऊन येत आहे एक निषिद्ध प्रेमकथा आणि लक्षवेधी केमिस्ट्री

प्रेम, महत्त्वाकांक्षा, सत्तासंबंध आणि आत्मसन्मान यांचा वेध घेणाऱ्या 'प्रेमाला कंडिशन्स अप्लाय' या नव्या ओरिजिनल सीरिजची घोषणा मराठी ZEE5ने केली आहे. सिद्धार्थ मेनन आणि जान्हवी उदय यांच्या प्रमुख भूमिका असलेल्या या सीरिजचे दिग्दर्शन गौरव पत्की आणि निर्मिती निर्मिती क्रिएटिव्ह माइंड प्रॉडक्शन्स यांनी केले आहे. कॉर्पोरेट जगतातील नियम आणि मनातील भावनांमध्ये अडकलेल्या दोन सहकाऱ्यांची ही भावनिक कथा आहे. कामाच्या ठिकाणी फुलणारे प्रेम, त्यासोबत येणारी गुंतागुंत आणि स्वतःच्या अस्तित्वासाठीचा संघर्ष यांची प्रभावी मांडणी या सीरिजमध्ये पाहायला मिळणार आहे. ही सीरिज 24 जून 2026 रोजी मराठी ZEE5वर प्रदर्शित होणार आहे.

'प्रेमाला कंडिशन्स अप्लाय' ही कथा अनन्या आणि ऋषी या दोन महत्त्वाकांक्षी तरुण प्रोफेशनल्सभोवती फिरते. कामाच्या ठिकाणी त्या दोघांची अचानकपणे ओळख होते आणि त्यांच्या आयुष्याला नवे वळण मिळते. सुरुवातीला सहज आणि नैसर्गिक वाटणारी त्यांची मैत्री हळूहळू अशा नात्यात बदलते, ज्याकडे दुर्लक्ष करणे दोघांनाही शक्य होत नाही. एकमेकांविषयीचे तीव्र आकर्षण, समान स्वप्ने आणि खोल भावनिक नाते यांमुळे ते प्रेमात पडतात. मात्र, ज्या वातावरणात प्रेमसंबंधांचे परिणाम भोगावे लागू शकतात.

कुणाच्याही नकळत एकमेकांकडे पाहणे, लांबणाऱ्या गप्पा, कॉफी ब्रेकदरम्यानचे खास क्षण आणि रात्री उशीरापर्यंत होणारे फोन हे अनन्या आणि ऋषी यांच्या आयुष्याचा भाग बनू लागतात. त्यातून दोघांमध्ये एक खास प्रमाचे नाते निर्माण होऊ लागते. या नात्यात उत्साह, आनंद तर असतोच, त्यासोबतच अनिश्चितताही असते. मात्र, त्यांचे प्रेम लपवून ठेवणे दिवसेंदिवस कठीण होत जाते, कारण कामाच्या ठिकाणच्या अपेक्षा, व्यावसायिक मर्यादा, पदानुक्रम आणि वैयक्तिक महत्त्वाकांक्षा हे घटक त्यांची परीक्षा घेऊ लागतात.

वेगवान कॉर्पोरेट जीवनशैली आणि आधुनिक




आयुष्यातील ताण यांच्या पार्श्वभूमीवर घडणारी 'प्रेमाला कंडिशन्स अप्लाय' गुंतागुंतीच्या प्रेमाचे रोमांच, मन मोकळे करण्यातील भावनिक असुरक्षितता आणि वैयक्तिक आनंद व व्यावसायिक जबाबदाऱ्या एकमेकांमोर उभ्या ठाकल्यावर घ्यावे लागणारे कठोर निर्णय यांचे या सीरिजमध्ये चित्र उभे करण्यात आले आहे. महत्त्वाकांक्षा, आत्मशोध आणि बंद दारांआड जपल्या जाणाऱ्या नात्याचे वास्तव यांचा सामना करताना प्रेमासाठी मोजावी लागणारी किंमत स्वीकारण्यास अनन्या आणि ऋषी तयार आहेत का, याचा विचार दोघांनाही करावा लागतो.

ट्रेलरची लिंक - https://youtu.be/BGLSakumspE?si=x41UHmrDrILg_C9E

झी मराठीच्या चीफ चॅनल ऑफिसर आणि मराठी ZEE5च्या बिझनेस हेड हेमा व्ही. आर. म्हणाल्या, "'प्रेमाला कंडिशन्स अप्लाय'च्या माध्यमातून आजच्या व्यावसायिक जगाशी जवळून जोडलेली आणि वास्तववादी वाटणारी प्रेमकथा पडद्यावर आणण्याचा आमचा प्रयत्न आहे. ही सीरिज केवळ प्रेमकथेपर्यंत मर्यादित राहत नाही, तर महत्त्वाकांक्षा, कामाच्या ठिकाणच्या मर्यादा आणि वैयक्तिक मूल्ये यांमध्ये समतोल साधण्याचे आव्हान आणि त्यातून निर्माण होणाऱ्या आधुनिक नातेसंबंधांतील गुंतागुंत यांचाही वेध घेते. या कथेची सर्वात मोठी जमेची बाजू म्हणजे तिचा प्रामाणिकपणा. अत्यंत दडपणाच्या वातावरणात प्रेम आणि करिअर यांचा समतोल साधताना अनेक तरुण व्यावसायिक ज्या द्विधा मनःस्थितीचा सामना करतात, त्याचे प्रतिबिंब या कथेत दिसते. व्यक्तिरेखांची भावनिक असुरक्षितता, त्यांनी घेतलेले तीव्र आणि कठीण निर्णय तसेच सत्तासंबंध आणि आत्मसन्मान यांभोवती उभ्या राहणाऱ्या व्यापक प्रश्नांशी प्रेक्षक निश्चितच जोडले जातील."

दिग्दर्शक गौरव पत्की म्हणाले," प्रेमाला सीमा नसतात, असे आपण अनेकदा ऐकतो. मात्र, अनन्या आणि ऋषी यांच्या बाबतीत ही गोष्ट तितकी सोपी नाही. करिअर आणि नातेसंबंध या दोन्हींचा समतोल साधण्याचा प्रयत्न करणारे सहकारी म्हणून त्यांना एकत्र काम करत असताना प्रेम टिकवून ठेवणे किती आव्हानात्मक असू शकते, याची जाणीव होते. 'प्रेमाला कंडिशन्स अप्लाय' ही वेगवान आणि आव्हानात्मक कार्यसंस्कृतीचा दबाव, शहरी जीवनातील गुंतागुंत आणि विशीतील अनिश्चितता यांचा सामना करत स्वतःचा मार्ग शोधणाऱ्या एका तरुण जोडप्याची हृदयस्पर्शी कथा आहे. प्रामाणिक, आपलेसे वाटणारे आणि आयुष्याचा उत्सव साजरा करणारे अनेक प्रसंगांनी सजलेली ही सीरिज प्रेमाच्या अपूर्ण, तरीही सुंदर अशा विविध रूपांचा गौरव करते."

सिद्धार्थ मेनन म्हणाला," 'प्रेमाला कंडिशन्स अप्लाय' ही नेहमीसारखी प्रेमकथा नाही, तर जगण्याच्या ताणाखाली उमलणाऱ्या प्रेमाची कथा आहे. ऋषीची भूमिका साकारताना व्यावसायिक मर्यादा आणि वैयक्तिक भावना यांमधील ताण अनुभवण्याची संधी मिळाली. त्याचबरोबर प्रेम आणि जवळीक यांचा अतिशय पारंपरिक, पण तरीही नव्या पद्धतीने शोध घेता आला. आजच्या कार्यसंस्कृतीशी जवळून जोडलेली ही व्यक्तिरेखा आणि ही कथा अत्यंत वास्तववादी वाटते. त्यामुळे तिच्या प्रामाणिकपणाशी प्रेक्षक निश्चितच जोडले जातील, असे मला वाटते."

जान्हवी उदय म्हणाली ,"'प्रेमाला कंडिशन्स अप्लाय'मधील अनन्याचा प्रवास आजच्या काळातील अनेक तरुण व्यावसायिकांना आपलासा वाटेल. करिअरमधील महत्त्वाकांक्षा, भावना आणि वैयक्तिक मर्यादा यांचा समतोल साधण्याचा प्रयत्न अनेकजण करत असतात. या प्रेमकथेचा मला सर्वाधिक आवडलेला पैलू म्हणजे अनेक आव्हानांचा सामना करत असतानाही प्रेमात असलेली दोन माणसे एकमेकांसोबत आणि एकमेकांसाठी कशी विकसित होत जातात, हे यात सुंदरपणे दाखवण्यात आले आहे. या कथेत अनेक सकारात्मक भावना आणि अनुभवांचा सुरेख मिलाफ आहे. प्रेक्षकांनी अनन्याची कथा आणि आमची कथा अनुभवावी, यासाठी मी खूप उत्सुक आहे."

# ४९ प्राथमिक शिक्षकांना केंद्रप्रमुख पदावर पदोन्नती; समुपदेशन प्रक्रियेद्वारे पदस्थापना निश्चित

ठाणे : जिल्हा परिषद ठाणे अंतर्गत प्राथमिक शिक्षण विभागामार्फत केंद्रप्रमुख पदाच्या रिक्त जागा भरण्याची प्रक्रिया पारदर्शक व गुणवत्ताधारित पद्धतीने पूर्ण करण्यात आली. मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांच्या उपस्थितीत दि. १९ जून, २०२६ रोजी जिल्हा परिषद सभागृहात आयोजित समुपदेशन कार्यक्रमात ४९ प्राथमिक शिक्षकांना केंद्रप्रमुख पदावर पदोन्नती देण्यात आली.

"केंद्रप्रमुख हे शैक्षणिक व्यवस्थेतील महत्त्वाचे नेतृत्व करणारे घटक आहेत. शाळांच्या गुणवत्तावाढीसाठी, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी तसेच शिक्षकांना प्रभावी मार्गदर्शन करण्यासाठी त्यांची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. पदोन्नती प्रक्रियेत पारदर्शकता, गुणवत्ता व न्याय्यतेची तत्त्वे जपण्यात आली आहेत. नवनियुक्त केंद्रप्रमुखांनी आपल्या नेतृत्वातून शिक्षण क्षेत्रात सकारात्मक बदल घडवून आणत जिल्ह्यातील शैक्षणिक गुणवत्ता अधिक उंचावण्यासाठी प्रयत्नशील राहावे," असे प्रतिपादन मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांनी केले.

सदर पदोन्नती प्रक्रियेसाठी एकूण १२३ उमेदवारांनी अर्ज केले होते. त्यापैकी ८५ उमेदवार पात्र ठरले असून ३४ उमेदवार अपात्र ठरले. दिव्यांग प्रवर्गातील ५ उमेदवार पात्र ठरले होते. सर्वसाधारण गटातील ४९ रिक्त केंद्रप्रमुख पदे भरण्यासाठी गुणवत्ता यादीतील अनुक्रमांक १ ते ५१ मधील उमेदवारांना (अनुक्रमांक १७ व १९ वरील अपात्र उमेदवार वगळून) समुपदेशनासाठी संधी देण्यात आली.

समुपदेशनादरम्यान गुणवत्ता यादीतील अनुक्रमांक ५१ वरील गोपाळ रोहिदास म्हात्रे यांनी केंद्रप्रमुख पदाची पदस्थापना स्वीकारण्यास लेखी नकार दिल्याने गुणवत्ता यादीतील अनुक्रमांक ५२ वरील श्रीमती दिपाली विजय बडगुजर यांना केंद्र निवडीची संधी देण्यात आली.

याप्रमाणे गुणवत्ता यादीतील अनुक्रमांक १ ते ५२ मधील उमेदवारांपैकी दोन अपात्र उमेदवार व एका उमेदवाराचा नकार वगळता एकूण ४९ उमेदवारांनी समुपदेशन प्रक्रियेद्वारे समूह साधन केंद्रांची निवड करून पदस्थापना निश्चित केली.

यावेळी जिल्ह्यातील सर्व तालुक्यांचे गटशिक्षणाधिकारी, केंद्रप्रमुख, शिक्षण विस्तार अधिकारी तसेच प्राथमिक शिक्षण विभागातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नवनियुक्त केंद्रप्रमुखांच्या वतीने प्रतिनिधींनी जिल्हा परिषद प्रशासनाने पदोन्नती प्रक्रिया गतिमान, पारदर्शक आणि वेळेत पूर्ण केल्याबद्दल समाधान व्यक्त केले. तसेच संपूर्ण प्रक्रियेदरम्यान शिक्षण विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सातत्याने मार्गदर्शन व पाठपुरावा केल्याबद्दल त्यांचे आभार मानले. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांच्या नेतृत्वाखाली ही प्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण झाल्याबद्दल त्यांच्याप्रतीही कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

जिल्हा परिषद ठाणे प्रशासनाच्या वतीने शिक्षण क्षेत्रातील गुणवत्ता वृद्धी, शैक्षणिक व्यवस्थापनाची परिणामकारकता आणि शाळांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी केंद्रप्रमुखांची भूमिका महत्त्वपूर्ण असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले.

# अनधिकृत शाळांमध्ये पाल्यांचा प्रवेश घेऊ नका

### माध्यमिक शिक्षण विभागाचे पालकांना आवाहन

ठाणे : विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित, त्यांचे शैक्षणिक हक्क आणि भविष्यातील शैक्षणिक अडचणी टाळण्यासाठी पालकांनी आपल्या पाल्यांचा प्रवेश केवळ शासनमान्य व अधिकृत शाळांमध्येच घ्यावा, असे आवाहन माध्यमिक शिक्षण विभागामार्फत करण्यात आले आहे.

शिक्षण विभागाच्या निदर्शनास काही ठिकाणी आवश्यक मान्यता व परवानगीशिवाय शाळा चालविल्या जात असल्याची बाब आली आहे. अशा अनधिकृत शाळांमध्ये प्रवेश घेतल्यास विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची शक्यता असून त्यांचे शैक्षणिक अभिलेख, वर्ग मान्यता, परीक्षा पात्रता तसेच पुढील प्रवेश प्रक्रियेमध्ये अडचणी निर्माण होऊ शकतात.

या पार्श्वभूमीवर शिक्षण विभागाने जिल्ह्यातील अनधिकृत शाळांची तपासणी करण्याचे निर्देश दिले असून संबंधित संस्थांवर नियमानुसार कारवाईची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. पालकांनी कोणत्याही शाळेत प्रवेश घेण्यापूर्वी त्या शाळेची शासनमान्यता, यू-डायस (UDISE) नोंदणी व इतर आवश्यक परवानग्यांची खातरजमा करावी, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. शाळा निवडताना केवळ आकर्षक जाहिराती किंवा इतर दाव्यांवर विश्वास न ठेवता संबंधित शिक्षण विभाग, गटशिक्षणाधिकारी कार्यालय किंवा शिक्षणाधिकारी कार्यालयाकडून माहिती पडताळून घ्यावी. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भविष्य सुरक्षित ठेवण्यासाठी पालकांनी विशेष दक्षता घेणे आवश्यक असल्याचे शिक्षण विभागाने नमूद केले आहे.

जिल्ह्यातील सर्व पालक, ग्रामपंचायती, शाळा व्यवस्थापन समित्या तसेच नागरिकांनी आपल्या परिसरात कोणतीही अनधिकृत शाळा कार्यरत असल्यास त्याची माहिती तात्काळ शिक्षण विभागास द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

# पनवेल महानगरपालिकेच्या स्थायी समितीच्या सभेत विविध विषयांना मंजूरी

पनवेल : पनवेल महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा आज दिनांक 22 जून रोजी महापालिका मुख्यालयात स्थायी समिती सभापती बबन मुकादम यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. यावेळी विविध विषयांना मंजूरी देण्यात आली.

यावेळी स्थायी समितीचे सर्व सदस्य, अतिरीक्त आयुक्त गणेश शेटे, अतिरीक्त आयुक्त महेशकुमार मेघमाळे, सचिव नानासाहेब कामठे, उपसचिव अक्षय कदम, उपायुक्त डॉ. वैभव विधाते, महापालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

पनवेल महानगरपालिकेकरीता २० नग फिरते स्वच्छतागृह/मोबाईल टॉयलेट ३ वर्षाच्या वॉरंटी सह खरेदी करणे या कामाच्या न्यूनतम दराची निविदा मंजूर करणे या विषयास मंजूरी देण्यात आली. पनवेल महानगरपालिका मालकीच्या प्रभाग समिती क मधील सर्व सार्वजनिक व कार्यालयांमधील शौचालयांचे सुशोभीकरण करणे व इतर अनुषंगिक कामे करणे या कामी न्यूनतम दराची निविदा मंजूरीस स्थायी समितीने मंजूरी दिली. पनवेल महानगरपालिका हद्दीत उद्यानांमध्ये विविध ठिकाणी आवश्यक असणाऱ्या खेळण्यासाठी रबर फ्लोरींग बसविणे याविषयाची माहिती घेऊन विषयास मंजूरी देण्यात आली.

पनवेल महानगरपालिका हद्दीतील तक्का येथील अं.मु.क्र. ४५६ ते १९०/२ अ (मोराज सोसायटी रस्ता) येथील रस्ता काँक्रिटीकरण करण्याच्या विषयास मंजूरी देण्यात आली.

पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती -



क, प्रभाग क्र.१३ मधील प्लॉट क्र. ०८, सेक्टर - ३२ कामोठे ख्रिश्चन समाजाकरीता दफनभूमी विकसित करणे या विषयाची सविस्तर माहिती देण्यात आली व विषयास मंजूरी देण्यात आली.

पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती – अ,ब व ड इतर मध्ये रस्त्यालगत असणाऱ्या गटर, पादचारी मार्गामधील इन्स्पेक्शन चेंबर्सवर वेळोवेळी आवश्यकतेनुसार सन २०२४-२५ व सन २०२५-२६ या दोन वर्षाकरीता झाकणे व किरकोळ दुरुस्ती करणे. या कामासाठी सुधारित वाढीव अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थिक मान्यता मिळण्याबाबतच्या विषयास स्थायी समितीने मंजूरी दिली

पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती अ, ब, क, ड व इतर मध्ये समाविष्ट होणाऱ्या गटरांची सन २०२३-२४ व सन २०२४-२५ या दोन वर्षाकरीता रस्त्यालगत असणाऱ्या गटर, पादचारी मार्गामधील इन्स्पेक्शन चेंबर्सवर वेळोवेळी आवश्यकतेनुसार FRP ची झाकणे लावणे व किरकोळ दुरुस्ती करण्याच्या विषयाची माहिती देऊन मंजूरी देण्यात आली.

पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती अ व ब प्रभाग कार्यालय (वॉर्ड ऑफिस) येथे फर्निचर व इतर अनुषंगिक कामे करण्याच्या विषयास स्थायी समितीने मंजूरी दिली.

पनवेल महानगरपालिकेमार्फत करण्यात येणाऱ्या विकास कामात अडथळा निर्माण करणारे महावितरण कंपनीचे विद्युत खांब, विद्युत वाहिन्या स्थलांतरित करणे व नवीन वीजपुरवठा घेणे कामी विद्युत व्यवस्थेची अनुषंगिक कामे दोन वर्षाकरीता करण्याच्या विषयास मंजूरी देण्यात आली.

पनवेल महानगरपालिका प्रभाग समिती क व ड क्षेत्रामधील रस्त्यावरील पथदिवे (सिडको हस्तांतरीत पथदिवे वगळून) व प्रशासकीय कार्यालये, शाळा, फिश मार्केट, स्मशानभूमी, पाण्याची टाकी, भाजी मार्केट, आंबेडकर भवन, आरोग्य केंद्रे, रुग्णालये, पादचारी उन्नत मार्ग (FOB) व इतर इमारती इत्यादी ठिकाणांच्या विद्युत व्यवस्थेची दोन वर्षाकरीता निगा, देखभाल, दुरुस्ती, सुधारणा व नुतनीकरण करण्याच्या विषयास स्थायी समितीने मंजूरी दिली.

पनवेल महानगरपालिका मालकीच्या इमारतीमधील विविध प्रकारच्या (स्प्लिट / विंडो / कॅसेट) व विविध क्षमतेच्या (१, १.५, २ TR) वातानुकूलित यंत्रणांची तीन वर्षाकरीता निगा, देखभाल व दुरुस्ती करणे, या कामाची न्यूनतम निविदा मंजूर करण्याच्या विषयास मंजूरी देण्यात आली.

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील विविध ठिकाणच्या उद्यानामध्ये डेकोरेटिव्ह पथदिवे खांब उभारून कार्यान्वित करणे विषयास मंजूरी देण्यात आली.

पनवेल महानगरपालिका प्रभाग समिती अ व ब क्षेत्रामधील रस्त्यावरील पथदिवे (सिडको हस्तांतरीत पथदिवे वगळून) व प्रशासकीय कार्यालये, शाळा, फिश मार्केट, स्मशानभूमी, पाण्याची टाकी, भाजी मार्केट, आंबेडकर भवन, आरोग्य केंद्रे, रुग्णालये, पादचारी उन्नत मार्ग (FOB) व इतर इमारती इत्यादी ठिकाणांच्या विद्युत व्यवस्थेची दोन वर्षाकरीता निगा, देखभाल, दुरुस्ती, सुधारणा व नुतनीकरण करणे कामी वाढीव रक्कमेस (Excess/Saving) मान्यता मिळण्याच्या विषयास स्थायी समितीने मंजूरी दिली.

पनवेल महानगरपालिकेच्या प्रभाग समिती अ व ब क्षेत्रात राबविण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमांसाठी दोन वर्षाकरीता विद्युत उपकरणे व विद्युत व्यवस्था भाडेतत्त्वावर उपलब्ध करून देण्याच्या विषयास समितीने मंजूरी दिली.

पनवेल महानगरपालिका हद्दीतील कामोठे, कळंबोली व खारघर येथील विविध रस्ते दुभाजकांचे सुशोभीकरण करण्याच्या विषयास मंजूरी देण्यात आली. पनवेल महानगरपालिका क्षेत्रात यांत्रिकी पद्धतीने धुरीकरण व फवारणी सेवा पुरविणेबाबतच्या विषयास मंजूरी देण्यात आली.

# ऑपरेशन टायगर फत्ते; चौकार नाही, थेट षटकार, सहा खासदारांच्या प्रवेशाने शिंदेंची शिवसेना आणखी भक्कम

■ २०२९ साली सहाच्या सहा खासदार पुन्हा निवडून येणार ■ बाळासाहेबांच्या विचारांसाठी सहा खासदारांचा शिंदेंच्या नेतृत्वावर विश्वास

मुंबई : ४० आमदारांपासून सुरू झालेल्या २०२२ च्या राजकीय उठावानंतर एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाला मिळणारा पाठिंबा सातत्याने वाढत असल्याचे चित्र सोमवारी पुन्हा एकदा स्पष्ट झाले. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटातील सहा विद्यमान खासदारांनी शिवसेनेत प्रवेश करत शिंदे यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त केला. "आता एक नाही तर सहा टायगर आमच्यासोबत आहेत. चौकार नाही, षटकार मारला आहे," असे सांगत शिंदे यांनी हा प्रवेश बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांच्या विजयाचा आणि शिवसेनेच्या वाढत्या ताकदीचा पुरावा असल्याचा दावा केला.

यशवंतराव चव्हाण सेंटर येथे पार पडलेल्या या पक्षप्रवेश सोहळ्यात परभणीचे तीन वेळा निवडून आलेले खासदार संजय (बंडू) जाधव, शिर्डीचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे, धाराशिवचे खासदार ओमराजे निंबाळकर, ईशान्य मुंबईचे खासदार संजय दिना पाटील, यवतमाळ-वाशीमचे खासदार संजय देशमुख आणि हिंगोलीचे खासदार नागेश पाटील आष्टीकर यांनी शिवसेनेत प्रवेश केला.

या वेळी शिवसेनेचे ज्येष्ठ नेते रामदास कदम, गजानन कीर्तिकर, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, मंत्री गुलाबराव पाटील, मंत्री भरत गोगावले, तसेच पक्षाचे अनेक मंत्री, खासदार, आमदार आणि पदाधिकारी उपस्थित होते.

सहा खासदारांचे स्वागत करताना शिंदे म्हणाले की, २२ जून २०२२ रोजी शिवसेना, धनुष्यबाण आणि बाळासाहेब ठाकरे यांची विचारधारा वाचवण्यासाठी सुरू झालेल्या लढ्याचा हा दुसरा टप्पा आहे. सुरुवातीला ४० आमदार सोबत होते, तर आज सहा खासदारांनी शिवसेनेत प्रवेश करून त्या लढ्याला नवे बळ दिले आहे. "आता एक नाही तर सहा टायगर आपल्या सोबत आहेत," असे ते म्हणाले.

बाळासाहेबांच्या विचारांवर श्रद्धा असलेले शिवसैनिक अखेर शिवसेनेतच एकवटतात, असे सांगताना त्यांनी स्पष्ट केले की, "जिथे शिवसेनेचे विचार, तिथे शिवसैनिक. त्यामुळेच हे सहा खासदार आज बाळासाहेबांच्या शिवसेनेत आले आहेत."

या सर्व खासदारांनी मतदारसंघातील कार्यकर्त्यांशी आणि जनतेशी चर्चा करून हा निर्णय घेतल्याचा उल्लेख करत शिंदे म्हणाले की, विकास, कार्यकर्त्यांचा सन्मान आणि जनतेची कामे हा त्यांचा प्रमुख विचार होता. काहींनी टीका केली, आरोप केले, परंतु त्यांनी जनतेच्या हिताला प्राधान्य दिले.

प्रवेश केलेल्या प्रत्येक खासदाराच्या कार्यशैलीचे कौतुक करताना शिंदे यांनी संजय



बंडू जाधव यांना जमिनीशी नाळ जोडून काम करणारे कार्यकर्ते, संजय दिना पाटील यांना बेधडक आणि सामान्य माणसांचा कैवारी, तर ओमराजे निंबाळकर यांना "रिअल स्टार" असे संबोधले. संजय देशमुख यांच्या कामाचे कौतुक करत त्यांनी त्यांना आणखी मोठ्या प्रमाणावर काम करण्यासाठी शिवसेना व्यासपीठ उपलब्ध करून देईल, असे सांगितले. नागेश पाटील आष्टीकर यांच्या बिंदास स्वभावाचा उल्लेख करताना, त्यांच्या वाटेला जाणाऱ्यांना त्यांची ताकद समजेल, असे ते म्हणाले. भाऊसाहेब वाकचौरे यांना "गावातही वाघ आणि राजकारणातही वाघ" असे संबोधत त्यांनी त्यांचे विशेष स्वागत केले.

"हे खासदार कोणत्याही वैयक्तिक स्वार्थासाठी आलेले नाहीत. ते मतदारसंघाच्या विकासासाठी, कार्यकर्त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी आणि जनतेच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी शिवसेनेत आले आहेत," असे शिंदे यांनी स्पष्ट केले.

ओमराजे निंबाळकर यांच्या कुटुंबावर आलेल्या कठीण प्रसंगाचा संदर्भ देत त्यांनी, "शिवसेना आणि एकनाथ शिंदे तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहेत," असा विश्वास दिला.

२०२२ च्या निर्णयावर टीका करणाऱ्यांना उत्तर देताना शिंदे म्हणाले की, त्या वेळी अनेकांनी एकही आमदार निवडून येणार नसल्याचा दावा केला होता. मात्र जनतेने त्यांचा निर्णय स्वीकारला आणि ६० आमदार निवडून आले. "जर आमचे आमदार निवडून आले नसते तर मी राजीनामा देऊन गावी शेती करायला गेलो असतो," अशी आठवणही त्यांनी करून दिली.

अडीच वर्षांच्या काळात राज्यात विकासाला गती मिळाल्याचा दावा करत त्यांनी लाडकी बहीण योजना, शेतकरी हिताच्या योजना आणि विविध विकासकामांचा उल्लेख केला. जनतेने आणि लोकप्रतिनिधींनी दिलेल्या पाठिंब्यामुळेच शिवसेना चांदा ते बांदा विस्तारत असल्याचे त्यांनी सांगितले.

महापौर, नगरसेवक, जिल्हा परिषद अध्यक्ष, सरपंच आणि विविध स्तरांवरील लोकप्रतिनिधी मोठ्या प्रमाणात शिवसेनेत सहभागी होत असल्याचा उल्लेख करत त्यांनी पक्षाचा वाढता विस्तार अधोरेखित केला.

बाळासाहेब ठाकरे आणि अटल बिहारी वाजपेयी यांच्या काळातील विचारधारात्मक भूमिकेची आठवण करून देत शिंदे म्हणाले की, शिवसेनेची भूमिका स्पष्ट आणि स्वच्छ आहे. काहींनी विचारधारा सोडली म्हणून महाराष्ट्राने त्यांना नाकारले. महाराष्ट्राच्या संस्कृतीला आणि जनतेच्या अपेक्षांना साजेसा विकासाचा मार्ग आम्ही स्वीकारला आहे. असा टोला त्यांनी उद्धव ठाकरे यांचे नाव न घेता लगावला.

"दिलेला शब्द पाळणे हीच आमची सर्वात मोठी ताकद आहे," असे सांगत त्यांनी नव्याने प्रवेश केलेल्या खासदारांच्या मतदारसंघातील प्रकल्प, विकासकामे आणि प्रश्न प्राधान्याने सोडवले जातील, अशी ग्वाही दिली. "हा एकनाथ शिंदे यांचा शब्द आहे," असे ते म्हणाले.

स्वतःला आजही कार्यकर्ता मानत असल्याचे सांगताना शिंदे म्हणाले की, शिवसेनेत कोणी मालक नाही. येथे सर्वजण सहकारी आहेत. प्रत्येक कार्यकर्त्याचा सन्मान राखला जाईल आणि कोणाचाही अनादर होणार नाही. हे डबल इंजिन सरकार असल्याने केंद्र आणि राज्याच्या समन्वयातून विकासकामांना अधिक गती मिळेल, असे सांगत त्यांनी नव्या खासदारांच्या प्रश्नांसाठी स्वतंत्र बैठक घेण्याची घोषणाही केली

"सर्वांनी मिळून शिवसेना अधिक बळकट करायची आहे. गावागावात आणि घराघरात शिवसेना पोहोचवायची आहे. ही सगळी ताकद एकत्र आल्यावर महाराष्ट्रात आणखी मजबूत शिवसेना उभी राहील," असे आवाहन त्यांनी केले.

"ऑपरेशन टायगर"बाबत माध्यमांमध्ये सुरू असलेल्या चर्चेचा संदर्भ देत शिंदे म्हणाले, "हे नाव पत्रकारांनी दिले असले तरी आम्ही कोणतेही ऑपरेशन अर्धवट करत नाही. आम्ही ऑपरेशन फुलप्रूफ करतो. आज सहाही खासदार शिवसेनेत सामील झाले आहेत आणि त्यामुळे ऑपरेशन टायगर पूर्णपणे यशस्वी झाले आहे."

# मनोरुग्णांसाठी योग म्हणजे मानसिक आरोग्याची संजीवनी : डॉ. नेताजी मुळीक

ठाणे : मानसिक आरोग्य सुदृढ ठेवण्यासाठी योगाचे महत्त्व अनन्यसाधारण असून मनोरुग्णांच्या उपचार व पुनर्वसन प्रक्रियेत योगाची महत्त्वपूर्ण भूमिका आहे, असे प्रतिपादन प्रादेशिक मनोरुग्णालय, ठाणे येथील वैद्यकीय अधीक्षक डॉ. नेताजी मुळीक यांनी केले.

आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त प्रादेशिक मनोरुग्णालयात आयोजित विशेष योग सत्रात ते बोलत होते. अंबिका योग कुटीर यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कार्यक्रमात वैद्यकीय अधिकारी, शुश्रूषा अधिकारी, कर्मचारी तसेच मनोरुग्णांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

यावेळी विविध योगासने, प्राणायाम आणि ध्यानधारणेची प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. नियमित योगाभ्यासामुळे तणाव कमी होतो, मन शांत राहते, भावनिक संतुलन राखण्यास मदत मिळते तसेच आत्मविश्वास आणि सकारात्मकता वाढते, अशी माहिती उपस्थितांना देण्यात आली.

डॉ. मुळीक म्हणाले की, योग हा केवळ शारीरिक व्यायाम नसून मन, शरीर आणि विचार यांच्यात समतोल निर्माण करणारी जीवनशैली आहे. विशेषतः मनोरुग्णांसाठी योग हा मानसिक स्वास्थ्याचा प्रभावी आधार ठरू शकतो. त्यामुळे समाजाने योगाला दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनवावे, असे आवाहन त्यांनी केले.




या कार्यक्रमातून मानसिक आरोग्याविषयी जनजागृती करत निरोगी आणि संतुलित जीवनाचा संदेश देण्यात आला.



बेस्ट कर्मचाऱ्यांना अंतरिम दिलासा म्हणून ३००० रुपये आणि वेटलिजवरील कर्मचाऱ्यांना २००० रुपये मासिक हंगामी वाढ

# कर्मचाऱ्यांची ग्रॅच्युईटीची रक्कम अदा करावी

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे निर्देश

### बेस्ट सक्षमीकरण आणि कर्मचारी मागण्यांच्या अनुषंगाने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतलेल्या बैठकीत निर्णय

### संप मागे घेत असल्याचे कृती समितीने केले जाहीर

मुंबई : बेस्ट उपक्रमाच्या सक्षमीकरणासाठी आणि कर्मचाऱ्यांच्या मागण्यांच्या अनुषंगाने महत्त्वाचे धोरणात्मक निर्णय आज उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत निर्णय घेण्यात आले आहेत. या बैठकीनंतर झालेल्या पत्रकार परिषदेत संप मागे घेण्यात आल्याचा निर्णय कृती समितीने जाहीर केले.

कर्मचाऱ्यांची प्रलंबित ग्रॅच्युईटीची रक्कम याच आर्थिक वर्षात अदा करण्याचा तसेच नवीन वेतन करार होईपर्यंत कर्मचाऱ्यांना अंतरिम दिलासा म्हणून बेस्टच्या कर्मचाऱ्यांना ३००० रुपये आणि वेटलिजवरील कर्मचाऱ्यांना २००० रुपये मासिक हंगामी वाढ देण्याचे मान्य करण्यात आले.

सह्याद्री अतिथीगृह येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक झाली. या बैठकीस परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, आमदार सचिन अहिर, आमदार मुरजी पटेल, उपमुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव असीम गुप्ता, प्रधान सचिव नविन सोना, मुंबई महापालिका आयुक्त अश्विनी भिडे, बेस्टच्या महाव्यवस्थापक सोनिया सेठी, तसेच बेस्ट कर्मचारी कृती समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.

बेस्ट बस सेवा तात्काळ सुरू करण्याचे निर्देशही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी दिले. कर्मचाऱ्यांची प्रलंबित ग्रॅच्युईटीची रक्कम याच आर्थिक वर्षात अदा करण्यात यावी. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक बळकट करण्यासाठी पुढील तीन वर्षांत ५००० नवीन बसेस स्वतःच्या मालकीच्या घेण्यात येणार असून, त्यासाठी आवश्यक आर्थिक तरतूद नियोजित पद्धतीने करण्याचे निर्देश यावेळी दिले. याशिवाय, नवीन वेतन करार होईपर्यंत कर्मचाऱ्यांना अंतरिम दिलासा म्हणून बेस्टच्या कर्मचाऱ्यांना ३००० रुपये आणि वेटलिजवरील कर्मचाऱ्यांना २००० रुपये मासिक हंगामी वाढ देण्याचे मान्य करण्यात आले आहे. बेस्ट प्रशासनाने तयार केलेला 'कायापालट' प्रस्ताव तातडीने शासनास सादर करून त्यास मंत्रिमंडळाची मान्यता घेतली जाईल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री श्री.शिंदे यांनी दिली. बेस्ट ही मुंबईकरांची लाईफलाईन असून, ती सक्षम करणे आवश्यक असल्याचे उपमुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

# *ठाण्यात ऑपरेशन पाणी पुरवठा कधी?*



*देशातील, राज्यातील, ठाण्यातील भाजपा सेना सत्ताधारी मोठमोठी ऑपरेशन करण्यात मग्न आहेत. सत्ता -पैशांच्या जोरावर ऑपरेशन करण्यात त्यांचा विशेष हातखंडा आहे. परंतु त्यांच्या या ऑपरेशनमुळे ठाणेकरांचे आयुष्यमान सुधारण्याचे उदाहरण अलीकडच्या काळात नाही.*

*त्यांच्या ऑपरेशनमुळे त्यांच्याही वैचारिक भूमिकेत फार मोठी सुधारणा झाली आहे अशी ही स्थिती नाही. मुळात त्यांची ऑपरेशन होतात कशासाठी हाही प्रश्न जनतेच्या विस्मरणात गेला आहे... वारंवार होणाऱ्या अशा ऑपरेशनमुळे लोकशाही रुपी पेशंट दगावण्याची शक्यता अधिक आहे. जनतेला या ऑपरेशनचा आता कंटाळा आला आहे. डॉक्टर धड नाही अशीच काय ती भूमिका या ऑपरेशन बाबत जाणकार लोकांची आहे.*

*अशा वारंवार होणाऱ्या ऑपरेशनचा वीट ठाणेकर जनतेला आला आहे...यातून एक प्रश्न निर्माण होत आहे. जो ठाण्यातील नाक्या नाक्यावर विचारला जात आहे. ठाण्यातील जनतेला मुबलक पाणीपुरवठा करणारं ऑपरेशन होणार कधी? हे ऑपरेशन व्हायला नेमके हात का थरथरत आहेत? जे जनतेला हवंय... जे ठाणेकरांना हवंय ते देण्याची दानत या ऑपरेशन करणाऱ्या सत्ताधाऱ्यांमध्ये का नाही... असाही प्रश्न या निमित्ताने निर्माण होत आहे.*

*कधीतरी ठाण्यात गेली 25 वर्षे सत्तेत राहणाऱ्या या राजकीय नेत्यांनी स्वतः आरशात उभे राहून पहायला हव. स्वतःला ऑपरेशन तज्ञ म्हणून या सर्जन ने प्रश्न विचारायला हवा... राज्यात दुष्काळी परिस्थिती आहे.त्यात लोकप्रतिनिधींच्या खरेदी विक्रीसाठी प्रचंड पैशांचा पाऊस पडत आहे.पावसाने केलेला उशीर शेतकऱ्यांना जेरीस आणत आहे आणि या स्थितीत सर्वसामान्य ठाणेकरांना दिलासा देण्या ऐवजी केंद्रातील आपल्या राजकीय बापांच्या हुजरेगिरीला तुम्ही ऑपरेशन म्हणणार असाल तर ही ऑपरेशन ठाणेकर जनता आणि सर्वसामान्य मराठी माणसाच्या हिताची नक्कीच नाहीत... ठाणे शहरावर पाणी टंचाईचे संकट आहे.पाणी कपातीला सुरुवात झाली आहे... ऑपरेशन स्पेशालिस्ट असणाऱ्यांनी ठाण्यातील पाणीटंचाईचा ऑपरेशन प्राधान्याने करायला हवा होता मात्र ते का करत नाहीत हा प्रश्न सामान्य माणूस घराघरात विचारत आहे.*

***- संजय घाडीगांवकर***
*ठाणे*

## नवी मुंबईच्या उत्तम डे गिर्यारोहकाने फ्रेंडशिप पीक केले सर

पनवेल : नवी मुंबई स्थित गिर्यारोहक आणि निसर्गप्रेमी उत्तम डे यांनी हिमाचल प्रदेशातील फ्रेंडशिप पीक यशस्वीपणे सर केले आहे. हिमालयाच्या पीर पंजाल पर्वतश्रेणीतील 5,289 मीटर (17,353 फूट) उंच असलेले, फ्रेंडशिप पीक हे जास्त उंचीच्या पर्वतारोहणासाठी भारतातील सर्वाधिक मागणी असलेले शिखर म्हणून ओळखले जाते.

या मोहिमेस मनालीमध्ये सुरुवात झाली आणि सोलांग व्हॅली, अल्पाइन रान, मोरेन आणि हिमनदी असलेल्या भागामधून पुढे गेली. 9 जून रोजी रात्री 11 वाजता सुरू झालेल्या अंतिम टप्प्यापूर्वी लौहाली, लेडी लेग आणि समिट कॅम्प येथे या मोहिमेचे कॅम्प होते. रात्रभर चढणे अत्यावश्यक होते, कारण खिंडीच्या पलीकडे असलेले भाग खड्डे आणि हिमस्खलन-प्रवण भूभागाचे होते. सूर्याने बर्फ निसरडा होण्यापूर्वी पहाटेच्या वेळी सुरक्षित उतरता आले. पालकांचा आशीर्वाद आणि भक्कम पाठबळ, देवाची कृपा, शांत वारा, स्वच्छ हवामान आणि मदर माउंटनच्या साक्षीने उत्तमने 10 तास चढाई केली आणि 10 जून 2026 रोजी सकाळी 6:05 वाजता ते शिखरावर पोहोचले. शिखरावर पोहोचल्यानंतर दोनच मिनिटात त्यांनी भारतीय राष्ट्रध्वज फडकावला आणि आनंदाश्रूनी त्यांचे डोळे भरून आले.

"जेव्हा तुम्ही तिच्या कुशीत येता तेव्हा तुम्ही नतमस्तक व्हाल याची खात्री पर्वत करतात. ते नम्रता शिकवतात, तुम्हाला आठवण करून देतात की स्वतःला किंवा पर्वताला कमी लेखू नका, पाय जमिनीवर भक्कम रोवून राहा आणि पुढे जात राहा," डे आपली प्रतिक्रिया व्यक्त करतात. ते पुढे सांगतात, "माझ्यासारख्या पाच फूट उंचीच्या लोकांना अनेकदा कमी लेखले जाते. हे पर्वत मला बळ देतात. ते मला सांगतात, 'उत्तम, आयुष्यात स्वतःला कमी लेखू नकोस फक्त चालत राहा.' जेव्हा मी एखादे शिखर सर करतो, तेव्हा मी जगाला संदेश देतोः तुमची उंची कमी असली तरी ठीक आहे. कठीण परिस्थितीवर मात करण्यासाठी मजबूत आणि मोठी ध्येय गाठण्याची मानसिकता असणे महत्त्वाचे आहे."

## दिवा परिसरातील 113 अनधिकृत गोडाऊनवर निष्कासनाची कारवाई

ठाणे (मेधा भोईटे) : ठाणे महानगरपालिका हद्दीतील अनधिकृत गोडाऊनविरोधात प्रशासनाने धडक कारवाई सुरू केली असून आज दिवा प्रभाग समिती क्षेत्रात अनधिकृत गोडाऊनचे सर्वेक्षण आणि निष्कासन मोहीम राबविण्यात येत आहे. आज 113 अनधिकृत गोडावूनवर निष्कसनाची कारवाई करण्यात आली. तर 830 गोडावूनचे सर्वेक्षण करण्यात आले.

महापालिका आयुक्त सौरभ राव आणि अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे यांच्या आदेशान्वये, उपायुक्त (अतिक्रमण नियंत्रण




व निष्कासन) जितेंद्र निकम, उपायुक्त (परिमंडळ-१) दीपक झिंजाड तसेच दिवा प्रभाग समितीचे सहाय्यक आयुक्त शिवप्रसाद नागरगोजे यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम सुरू आहे. निष्कासन मोहिमेच्या पहिल्या टप्प्यात रसायने, प्लास्टिक, ज्वलनशील पदार्थ तसेच स्क्रॅप साठवणूक करणाऱ्या गोडाऊनना प्राधान्य देण्यात येत असून, संभाव्य धोके टाळण्यासाठी अशा गोडाऊनवर कारवाई करण्यात येत आहे.

दरम्यान, शासकीय, आरक्षित तसेच सरकारी भूखंडांवर उभारण्यात आलेल्या अनधिकृत गोडाऊनची तपासणी आणि सर्वेक्षण सुरू असून, नियमबाह्य आढळणाऱ्या गोडाऊनवर यापुढेही कठोर निष्कासनाची कारवाई सातत्याने सुरू राहणार असल्याचे उपायुक्त दीपक झिंजाड यांनी नमूद केले.

# ... आणि मुलांच्या चेहऱ्यावर हास्य फुलले : महापौर शर्मिला पिंपळोलकर

ठाणे (गणेश भोईटे) : क्षयरोगाचा सामना करत असलेली वय वर्षे 3 ते 16 मधील मुले. त्यांना आनंद मिळावा.. त्यांची इच्छा पूर्ण व्हावी.. तसेच त्या मुलांना हवी असलेली एखादी वस्तू त्यांना मिळाल्यानंतर अर्थात त्यांची 'विश (Wish)' पूर्ण झाल्याचा आनंद आज ठाणे महानगरपालिकेत सर्वांना पाहायला मिळाला. निमित्त होते ठाणे महानगरपालिका आणि Make a Wish Foundation यांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमाचे. हा स्तुत्य उपक्रम राबविणाऱ्या महापालिकेच्याआरोग्य विभागाचे व मेक अ विश फाऊंडेशनचे महापौर शर्मिला पिंपळोलकर यांनी



कौतुक केले.

ठाणे महानगरपालिकेच्या कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात ठाणे महानगरपालिका सार्वजनिक आरोग्य विभाग व मेक अ विश फाऊंडेशनतर्फे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास महापौर शर्मिला पिंपळोलकर, उपमहापौर कृष्णा पाटील, सभागृह नेते हणमंत जगदाळे, ज्येष्ठ नगरसेवक राम रेपाळे, शिवसेना गटनेते पवन कदम, राष्ट्रवादी काँग्रेस गटाचे अजित पवार गटाचे गटनेते नजीब मुल्ला, नगरसेविका सहर शेख, मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रसाद पाटील, माता बालसंगोपन अधिकारी डॉ. वर्षा ससाणे आदी उपस्थित होते.

क्षयरोगाशी झुंज देणाऱ्या समाजातील गरजू आणि आजाराशी लढणाऱ्या 3 ते 16 वर्षे वयोगटातील बालरुग्णांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविण्याचा हा उपक्रम राबविण्यात आला. क्षयरोग हा केवळ शारीरिक आजार नसून तो रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबासाठी मानसिक, सामाजिक आणि आर्थिक आव्हान देखील निर्माण करतो. अशा परिस्थितीत उपचारांसोबत प्रेम, आपुलकी, प्रोत्साहन आणि आनंदाचीही तितकीच गरज असते. या बालकांच्या छोट्या छोट्या इच्छा पूर्ण करुन त्यांना नव्या आशा, नव्या उमेदीची भेट देत असल्याचे मेक अ विश फाऊंडेशनच्या स्मिता पाटील यांनी नमूद केले. या बालरुग्णांशी संवाद साधून त्यांना त्यांच्या वयोमानानुसार आवश्यक असलेल्या वस्तू उदा. सायकल, लॅपटॉप, मोबाईल, स्मार्ट वॉच, क्रिकेट किट आदी साहित्य या मुलांना वाटप करण्यात आले.

आजाराशी सामना करत असणाऱ्या मुलांच्या चेहऱ्यावर आनंद देण्याचे काम ठाणे महानगरपालिका व मेक अ विश फाऊंडेशन करत आहे. मुलांची गरज ओळखून त्यांच्याशी संवाद साधून त्यांना शिक्षणाच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या वस्तू आज त्यांना उपलब्ध करुन त्यांच्या चेहऱ्यावर एक आनंद निर्माण केल्याबद्दल व हा उपक्रम राबविणारे आरोग्य विभागाचे प्रमुख डॉ. प्रसाद पाटील व मेक अ विश फॉउंडेशनच्या स्मिता यांचे महापौर शर्मिला पिंपळोलकर यांनी कौतुक केले.

# मालमत्ता कर संकलनाचा १०० कोटींचा टप्पा पार; सुमारे ८३ हजार नागरिकांकडून १०२ कोटींचा भरणा

## पनवेल महानगरपालिकेचे जाहीर आवाहन — ३१ जुलैपर्यंत ५% सवलतीची संधी

पनवेल : पनवेल महानगरपालिकेच्या कर संकलन विभागाने चालू आर्थिक वर्षात उल्लेखनीय कामगिरी करत मालमत्ता कर संकलनात १०० कोटी रुपयांचा महत्त्वपूर्ण टप्पा पार केला आहे. महानगरपालिकेकडून मालमत्ता कर भरण्यासाठी नागरिकांना सातत्याने आवाहन करण्यात येत असून ऑनलाइन तसेच ऑफलाइन पद्धतीने कर भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या आवाहनाला नागरिकांचा सकारात्मक प्रतिसादामुळे आतापर्यंत एकूण ८३हजार ५२ मालमत्ताधारकांनी १०२ कोटी रुपये मालमत्ता कर भरून महानगरपालिकेला सहकार्य केले आहे.

पनवेल महानगरपालिकेच्या मालमत्ता कर संकलन मोहिमेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.पालिकेच्या कर संकलन विभागाने सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात जून महिन्यातच १०० कोटींचा महत्त्वपूर्ण टप्पा पार केला आहे.

पनवेल महानगरपालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्या सूचनेनुसार मालमत्ता धारकांसाठी विशेष सवलत जाहीर करण्यात आली आहे. दिनांक ३१ जुलै २०२६ पर्यंत मालमत्ता कर भरल्यास चालू मागणीवर ५% सवलत, तसेच ऑनलाइन पद्धतीने



कर भरल्यास अतिरिक्त २% सवलत मिळणार आहे. या सवलतीचा लाभ घेऊन शहरातील सर्व मालमत्ता धारकांनी वेळेत कर भरण्याचे आवाहन महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

मालमत्ता कराची देयके (बिले) तयार करण्यात आली असून त्यांचे वितरण युद्धपातळीवर सुरू आहे. महानगरपालिकेने नियुक्त केलेले बिल वितरक कर्मचारी कार्यक्षेत्रातील सर्व गृहनिर्माण संस्था, सोसायट्या व संकुलांमध्ये बिल वाटप करत आहेत. संबंधित गृहनिर्माण संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी आवश्यक प्रवेश व सहकार्य करून वितरण मोहिमेला हातभार लावावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

नागरिकांच्या सोयीसाठी मालमत्ता कराचे बिल ऑनलाइन उपलब्ध करून देण्यात आले आहे. नागरिकांनी www.panvelmc.org या संकेतस्थळावर किंवा "कर मित्र PMC" मोबाईल ॲपद्वारे बिल प्राप्त करून ऑनलाइन कर भरण्याची सुविधा वापरावी, असे आवाहन उपायुक्त स्वरूप खारगे यांनी केले आहे. आवश्यक असल्यास महानगरपालिका मुख्यालय किंवा संबंधित प्रभाग कार्यालयातूनही बिल उपलब्ध करून घेता येईल.

'महाराष्ट्र सम्राट' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर – डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई – ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम – ४००६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक – चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +९१-९१६७९५७७७१